


दैनिक

# दिव्य वतन

जनसामान्यांचा बुलंद आवाज

नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, बीड, जालना, नंदुरबार, धुळे, नाशिक

E-mail : divyawatanngp@gmail.com सोमवार दिनांक २६ जानेवारी २०२६ अंक : १७२ वा वर्ष : २ रे, मूल्य : ३ रुपये, पृष्ठे : ८


## हळदी-कुंकवासाठी निघालेल्या दोन बहिणींचा अपघाती मृत्यू

### एकाचे लग्न झालेले, दुसरीचे लग्न ठरलेले असताना काळाचा घाला

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर-भंडारा महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात दोन सख्ख्या बहिणींचा मृत्यू झाला आहे. हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमासाठी जात असताना एका अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. मृतांमध्ये २६ वर्षीय अलिशा अनिकेत मेहर (भूगाव, कामठी) आणि २७ वर्षीय मोनाली दिनेश्वर घाटोळे (तायगाव खैरी, सौसर, मध्य प्रदेश) यांचा समावेश आहे.

या दुर्दैवी घटनेने दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अलिशा मेहर यांचे लग्न सात महिन्यांपूर्वीच झाले होते. तर मोनाली घाटोळे यांचे लग्न येत्या २६ फेब्रुवारी रोजी निश्चित झाले होते. लग्नाची खरेदी आणि तयारी जोरात सुरू असतानाच काळाने त्यांच्यावर घाला घातला.

हा अपघात नागपूर-भंडारा महामार्गावरील महालगावनजीक नागनदीच्या पुलावर भर दुपारी घडला. पिपळा डाक बंगला परिसरातून भूगाव येथे हळदी-कुंकवासाठी जात असताना पाठीमागून येणाऱ्या एका अज्ञात भरधाव वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.धडक इतकी भीषण होती की, अलिशा मेहर यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर गंभीर जखमी झालेल्या मोनाली घाटोळे यांनी रुग्णालयात नेत असताना वाटेतच अखेरचा श्वास घेतला. त्या नणंद-भावजय (मामे-आत्ते बहीण) होत्या.या अपघातानंतर महामार्गावर काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. धडक देऊन पसार झालेल्या वाहनचालकाचा शोध घेण्यासाठी पोलीस परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत.

## धर्मेंद्र यांना पद्मविभूषण:अलका याज्ञिक यांना पद्मविभूषण

### रोहित शर्मा, रघुवीर खेडकर यांच्यासह महाराष्ट्रातील ११ जणांना पद्मश्री









दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई -केंद्र सरकारने रविवारी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला 2026 या वर्षासाठी 131 पद्म पुरस्कारांची घोषणा केली. यात महाराष्ट्रातील एकूण 15 जणांना पद्म पुरस्कार जाहीर झाले आहे. दिवंगत अभिनेते धर्मेंद्र यांच्यासह पाच व्यक्तींना पद्मविभूषण पुरस्कार जाहीर झाले आहे.महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, झारखंडचे माजी मुख्यमंत्री दिवंगत नेते शिबू सोरेन आणि गायिका अलका याज्ञिक यांच्यासह 13 व्यक्तींची पद्मभूषणसाठी निवड करण्यात आली आहे.दुसरीकडे, क्रिकेटपटू रोहित शर्मा, अभिनेता आर. माधवन, पॅरा-ॲथलीट प्रवीण कुमार, महिला क्रिकेटपटू हरमनप्रीत कौर आणि हॉकीपटू सविता पुनिया यांच्यासह 113 व्यक्तींना पद्मश्री पुरस्कारासाठी निवडण्यात आले आहे.

पद्म पुरस्कार विजेत्यांपैकी 19 महिला आहेत. त्यापैकी सहा परदेशी/NRI/PIO/OCI श्रेणीतील आहेत. सोळा व्यक्तींना मरणोत्तर हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

### पद्म पुरस्कार ३ श्रेणींमध्ये दिले जातात

**देशातील सर्वोच्च नागरी सन्मानांपैकी एक असलेले पद्म पुरस्कार तीन श्रेणींमध्ये दिले जातात - पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण. हे पुरस्कार कला, समाजसेवा, विज्ञान, अभियांत्रिकी, व्यवसाय, उद्योग, वैद्यकीय, साहित्य, शिक्षण, क्रीडा आणि नागरी सेवा यांसारख्या विविध क्षेत्रांतील उत्कृष्ट कार्यासाठी दिले जातात.**

**महाराष्ट्रातील एकूण 15 जणांना पद्म पुरस्कार**

महाराष्ट्रातून दिवंगत अभिनेते धर्मेंद्र यांना पद्मविभूषण, तर अलका याज्ञिक, दिवंगत पीयूष पांडे(मरणोपरांत), उदय कोटक यांना पद्मभूषण तर क्रिकेटपटू रोहित शर्मा, अभिनेता आर माधवन, लोकनाट्य कलावंत रघुवीर खेडकर, डॉ. अर्मिडा फर्नांडिस, तारपा वादक भिकल्या लाडक्या धिंडा व श्रीरंग लाड यांच्यासह 11 पद्मश्री पुरस्काराची घोषणा झाली आहे.

### महाराष्ट्रातील पद्म विजेते

**पद्मविभूषण**
**धर्मेंद सिंह देओल (मरणोपरांत) (कला)**
**पद्मभूषण**
**अलका याज्ञिक (कला)**
**पीयूष पांडे (मरणोपरांत) (कला)**
**उदय कोटक (उद्योग)**
**पद्मश्री**
**अर्मिडा फर्नांडिस (मेडिसिन)**
**अशोक खाडे (उद्योग)**
**भिकल्या लाडक्या धिंडा (कला)**
**जनार्धन बापुराव बोठे (सामाजिक कार्य)**
**जुझेर वासी (विज्ञान व अभियांत्रिकी)**
**माधवन रंगनाथन (कला)**
**रघुवीर खेडकर (कला)**
**रोहित शर्मा (क्रीडा)**
**सतीश शाह(मरणोपरांत) (कला)**
**सत्यनारायण नुवाल (उद्योग)**
**श्रीरंग लाड (कृषी)**













## महत्त्वाचे...

### पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते आज ध्वजारोहण

नागपूर : भारतीय प्रजासत्ताक दिनाचा मुख्य सोहळा सोमवार दिनांक २६ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजून १५ कस्तुरचंद पार्क येथें आयोजित करण्यात आला आहे. राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. त्यानंतर पोलीस दलाची मानवंदना स्वीकारतील तसेच पथ संचलानाची पाहणी ते करतील. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे ध्वजारोहणानंतर नागरिकांना संबोधित करणार आहेत. पोलीस दलांचे पथसंचलनामध्ये विविध पथके सहभागी होत आहेत. यामध्ये पोलीस दलांसह विद्यार्थी, विद्यार्थिनी ,पोलीस आदी असणार आहेत. या समारंभास स्वातंत्र्य संग्राम सेनानी, लोकप्रतिनिधी व माध्यम प्रतिनिधी व सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी केले आहे. भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त सायंकाळी ५.३० वाजता आर. एस. ए. मुंडले हायस्कूल येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

### श्रीकृष्ण नृत्यालयाचे विद्यार्थी प्रजासत्ताकदिनी दिल्लीत कर्तव्य पथावर

नागपूर : भारतीय शास्त्रीय नृत्यासाठीची एक अग्रगण्य संस्था असलेल्या श्रीकृष्ण नृत्यालयाच्या प्रतिभावान विद्यार्थ्यांची २६ जानेवारी रोजी दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय प्रजासत्ताक दिनी सोहळ्यात मोहिनीअट्टम सादर करण्यासाठी निवड झाली आहे. भारताच्या मा. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत 'मोहिनीचे नृत्य' सादर करणार आहेत. विद्यार्थ्यांनी १३ जानेवारी पासून कठोर प्रशिक्षण आणि तालमी केल्या आहेत. 'स्वातंत्र्याचा मंत्र-वंदे मातरम' या संकल्पने अंतर्गत २५०० कलाकारांचा समावेश असलेल्या एका मोठ्या सांस्कृतिक कार्यक्रमाचा भाग आहे. श्रीकृष्ण नृत्यालयाच्या संचालिका श्रीमती प्रमिला उन्नीकृष्णन आणि डॉ.हनी उन्नीकृष्णन यांनी संगीत नाटक अकादमी, दिल्लीद्वारे संस्थेच्या विद्यार्थ्यांची निवड झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन असून जो देशाच्या सांस्कृतिक विविधतेसह आणि लष्करी सामर्थ्यासह 'वंदे मातरम' या राष्ट्रगीताची १५० वर्षे साजरी करत आहे. दिल्लीच्या सोहळ्यात नागपूरच्या विद्यार्थ्यांचे सादरीकरण होत असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे उर्मिला उन्नीकृष्णन यांनी दिली.

### राष्ट्रसंत विचार साहित्य संमेलन आज

अकोला - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सेवा समितीच्या वतीने रविवारी २५ व सोमवारी २६ जानेवारी दरम्यान १२ वे राज्यस्तरीय राष्ट्रसंत विचार साहित्य संमेलन होणार आहे. शहरातील रिंग रोड स्थित जानोरकर मंगल कार्यालयात हे संमेलन होणार असून, परिसराला स्व. डॉ सुभाष सावरकर साहित्य नगरी हे नाव दिले आहे. विचार साहित्य संमेलनाचे तपपूर्ती वर्ष असल्यामुळे विविध स्पर्धा आणि कार्यक्रमाची रेलचेल राहणार आहे, अशी माहिती मुख्य संयोजक डॉ. रामेश्वर बरगट व स्वागतध्यक्ष प्रा. प्रकाश डवले, समितीचे अध्यक्ष गोपाल गाडगे यांनी दिली.उद्घाटन सत्रानंतर सायंकाळी ६ वाजता साहित्य संमेलनातील मानाचा समजला जाणारा ग्रामगीता जीवनगौरव पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

# ना. नितीन गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांच्या समस्यांवर फुंकर

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर - केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री ना. श्री. नितीन गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. नागपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या दमदार यशाबद्दल नागरिकांनी ना. श्री. गडकरी यांचे अभिनंदन केले. तर त्याचवेळी अनेकांनी यापूर्वीच्या जनसंपर्क कार्यक्रमातील कार्यवाहीनंतर आपल्या समस्या सुटल्याबद्दल ना. श्री. गडकरी यांचे आभारही मानले.






खामला चौकातील जनसंपर्क कार्यक्रमात ना. श्री. नितीन गडकरी यांना भेटण्यासाठी नागरिकांनी सकाळपासूनच गर्दी केली होती. कुणाला समस्यांचे निवेदन द्यायचे होते, कुणाला सदिच्छा भेट घ्यायची होती, तर कुणाला आभार मानायचे होते. ना. श्री. गडकरी यांच्या कार्यालयातून झालेल्या पाठपुराव्यामुळे अनेक दिवसांपासून रखडलेली प्रशासकीय कामे मार्गी लागल्याबद्दल नागरिकांनी कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी काही ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांनीदेखील ना. श्री. गडकरी यांची भेट घेतली. सरकारी योजनांमधून मदत मिळण्यासंदर्भात ज्येष्ठांनी निवेदने दिली. श्रावणबाळ, संजय गांधी निराधार यासारख्या योजनांच्या संदर्भात ज्येष्ठांना सहकार्य करण्याचे निर्देश ना. श्री. गडकरी यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले. तर दिव्यांग बांधवांनी सरकारी योजनांमधून सहकार्य मिळण्यासोबतच कृत्रिम अवयवांच्या मागणीसाठी ना. श्री. गडकरी यांना निवेदन दिले. त्यांच्या समस्यांवर फुंकर घालण्याचे काम जनसंपर्क कार्यक्रमातून झाले. विविध संस्थांचे प्रतिनिधी आपल्या संस्थांच्या अडचणी घेऊन यावेळी आले होते. काहींनी निधी, जागा किंवा परवानग्यांसंबंधी समस्या मांडल्या. सामाजिक व धार्मिक संस्थांनी त्यांच्या समुदायातील प्रश्न तसेच उपक्रमांसाठी मदतीची विनंती करणारी निवेदने दिली. गडकरी यांनी सर्व नागरिकांचे म्हणणे सविस्तरपणे ऐकून घेतले आणि संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले.

नागपूर महानगरपालिका, जिल्हाधिकारी कार्यालय, सेतू कार्यालय, नासुप्र, आरोग्य विभागांमधील अधिकारी जनसंपर्क कार्यक्रमात उपस्थित होते. त्यामुळे सर्वसामान्यांच्या समस्या सोडविणे अधिक सोयीचे ठरले.

## शेकापूर जि.प.शाळेच्या विद्यार्थ्यांची नावे 'आर्टेमिस-2' मोहिमेत शेकापूर विदर्भातील पहिली शाळा

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

काटोल : तालुक्यातील जंगलव्याप्त व आदिवासी बहुल भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शेकापूर येथील तेरा विद्यार्थी व दोन शिक्षकांची नावे थेट चंद्रावर जाणाऱ्या 'नासा'च्या आंतरराष्ट्रीय अवकाश मोहिमेत नोंदवली गेली आहेत. 'आर्टेमिस-२' या ऐतिहासिक मोहिमेत 'व्हर्च्युअल गेस्ट' म्हणून त्यांच्या सहभागाची अधिकृत नोंद झाली असून, नासाकडून त्यांना ऑनलाईन बोर्डिंग पास प्राप्त झाले आहेत. हा क्षण शाळेसह संपूर्ण परिसरासाठी अभिमानास्पद ठरला आहे.'आर्टेमिस-२' मोहिमेसाठी नासाने जगभरातून 'व्हर्च्युअल गेस्ट' म्हणून सहभागी होण्याचे आवाहन केले होते. त्यास शेकापूर शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत नोंदणी केली होती. नोंदणीनंतर संबंधितांना बोर्डिंग पास व नोंदणी क्रमांक ऑनलाईन स्वरूपात देण्यात आले आहेत. या मोहिमेत शाळेचे मुख्याध्यापक डॉ. राजेंद्र विमल रामहरी टेकाडे, स्वयंसेविका मनिषा रघुनाथ धुर्वे तसेच विद्यार्थी मनस्वी धुर्वे, कशिश कौरती, निर्भय मरकामे, प्रियांशी नेहारे, गिरीष मरकामे, धनश्री कौरती, विधी धुर्वे, धनश्री कळसाईत, पायल कुंभरे, युग नेवारे, अथर्व कौरती, सार्थक शेंदरे, रियान राऊत यांनी नोंदणी केली असून त्यांना ऑनलाईन बोर्डिंग पास प्राप्त झाले आहेत.




"जिल्हा परिषदेच्या शाकेतील विद्यार्थी व शिक्षक कुठेही कमी नाहीत. त्यांना जागतिक स्तरावरील अद्ययावत ज्ञान व तंत्रज्ञानाची योग्य ओळख करून दिल्यास ते नक्कीच उजवे ठरतात. विद्यार्थ्यांच्या हितासाठी नवनवीन प्रयोग करणे हेच शिक्षणाचे खरे सामर्थ्य आहे. 'आर्टेमिस-२' मोहिमेतील सहभागातून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचा हा एक छोटासा प्रयत्न आहे."

**डॉ. राजेंद्र रामहरी टेकाडे**
मुख्याध्यापक जि.प.प्राथमिक शाका, शेकापूर

या विद्यार्थ्यांची नावे एका विशेष एसडी कार्डमध्ये संग्रहित करून 'ओरियन' अंतराळयानाद्वारे चंद्राकडे पाठवली जाणार आहेत. सुमारे दहा दिवस चालणारी 'आर्टेमिस-२' मोहीम एप्रिल २०२६ पूर्वी फ्लोरिडा येथील केनेडी स्पेस सेंटरवरून प्रक्षेपित होणार आहे. अंतराळवीर चंद्राच्या पलीकडे सुमारे ४,६०० मैलांचा प्रवास करून पॅसिफिक महासागरात सुरक्षित परतणार आहेत.या मोहिमेत नासाचे अंतराळवीर रीड वाइझमन, व्हिक्टर ग्लोव्हर, क्रिस्टीना कोच तसेच कॅनेडियन स्पेस एजन्सीचे अंतराळवीर जेरेमी हॅन्सन सहभागी होणार आहेत. स्पेस लॉन्च सिस्टीम (एसएलएस) रॉकेटद्वारे होणारी ही मोहीम चंद्रावर मानवी वसाहतीच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल मानली जात आहे.

या मोहिमेचे प्रक्षेपण विद्यार्थी व्हर्च्युअली पाहणार असून, नासाच्या अंतराळवीरांशी संवाद साधण्याचा मानस आहे. भविष्यात भारतीय वंशाच्या आणि नासाच्या सेवानिवृत्त अंतराळवीर सुनीता विल्यम्स यांच्याशी विद्यार्थ्यांचा व्हर्च्युअल संवाद घडवून आणण्याचाही शाळेचा संकल्प आहे. या यशाबद्दल शिक्षक, विद्यार्थी व पालकांकडून सर्वत्र कौतुक होत आहे.

## मेहर इंग्लिश स्कूलच्या वार्षिकोत्सवात खान, गोस्वामी व मान्यवरांचा सन्मान

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर : वांजरा येथील मेहर इंग्लिश स्कूलमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही शालेय वार्षिकोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. हा कार्यक्रम शाळेचे अध्यक्ष मूलचंदजी मेहर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अल्पसंख्यांक विभागाच्या प्रदेश सचिव शायदा अहमद खान, नागपूर शहर महिला काँग्रेसच्या सचिव सौ. कल्पना गोस्वामी, शाळेच्या सचिव व मुख्याध्यापिका वंदना शंकर मेहर उपस्थित होत्या. कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांचा शाळेच्या वतीने सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे शिक्षक, कर्मचारी व पालकांनी सहकार्य केले.




या वार्षिकोत्सवाला मो. समीम, तेजेंद्र मेहर, संतोष समरीते, रिझवान भाई, प्रणिता हटवार, अनिती मेश्राम, सचिन चंद्रवंशी, पप्पू सर, मेहर अन्सारी, तनमय डांगरे, प्रियंका मेहर, वैसली मेहर, सोनाली समरीते, फरिया, मो. असजद यांच्यासह शाळेचे विद्यार्थी, पालक व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## शिवशक्ती नगरात श्रीराम जन्मोत्सवचा दुसरा वर्धापनदिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा

दिव्य वतन /वृत्तसेवा

नागपूर : दक्षिण नागपुरातील मानेवाडा रिंग रोड येथील श्री हनुमान सेवा पंच कमेटी शिवशक्ती नगर नंबर २ व ३ च्यावतीने हनुमान सेवा पंचकमेटी तर्फे श्रीराम दरबार व विठ्ठल रूख्मिणी मूर्ती वर्धापनदिन द्वितीय वर्षपूर्ती सोहळा नुकताच थाटामाटात साजरा करण्यात आला. वर्धापनदिन कार्यक्रम गुरुवारी २२ जानेवारीला मूर्तीची पुजा अभिषेक व महाआरती तसेच सुन्दरकांड सह भजनाचा आनंद घेण्यात आला. त्यानंतर दुपारी बाईक रॅलीत वस्तीतील नागरिक सहभागी झाले होते. याप्रसंगी दक्षिण नागपूरातील प्रभाग 34 मधले भारतीय जनता पक्षाचे निवडून आलेले उमेदवार बाबाराव तायडे, नागेश मानकर, सौ. मंगलाताई खेकरे आणि मनीषा नगरधनकर यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभली. शिवशक्ती नगर हनुमानाच्या मंदिरातून बाईक रॅलीला सुरुवात झाली आणि संपूर्ण एरियामधून वाजत गाजत आनंदाने रॅली निघून मंदिरात पोहोचली. कारण श्रीराम जन्मोत्सवाचे हे दुसरं वर्ष आहेत. या रॅलीमध्ये कमीत कमी शेकडो लोकांनी सहभाग घेतला होता. यावेळी भाजपचे श्री संजय ठाकरे, प्रदिप गणोरकर, हेंमत वाघाडे, पराग धर्माधिकरी, व राजेश वाघाडे तसेच आकाश वाघाडे यांच्यासह उपस्थित होते.



## नागरिक समीती प्रभाग क्रमांक १७ तर्फे नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार

दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी

नागपूर महानगरपालिका 2026 च्या नुकत्याच पार पडलेल्या प्रभाग क्रं. १७ प्रभागातील सर्वच विजयी नगरसेवकांचा अभिनंदन समारंभाचे आयोजन गुरुवारी २२ जानेवारीला करण्यात आले होते. प्रभागात ३ नगरसेवक कांग्रेस पक्षाचे तर १ नगरसेवक भा.ज.पा.चा निवडून आलेत. समारंभाचे अध्यक्ष माजी आमदार दीनानाथ पडोळे, प्रमुख अतिथी अधिवक्ता अशोक यावले आणि माजी नगरसेवक डॉ. सूर्यकांत भगत होते. समारंभास नवनिर्वाचित नगरसेवक सौ. सुजाता कोंबाडे. सौ कांचन चव्हाण, सुहास नानवटकर आणि मनोज साबळे हे सत्कार मूर्ती म्हणून उपस्थित होते. चारही नगरसेवकांनी सर्व मिळूनच या प्रभागाचा सर्वांगीण विकास करण्यात आम्ही योग्य समन्वय ठेऊन विकास करण्यास कटिबद्ध आहोत. अशी ग्वाही दिली. अध्यक्ष व अतिथींनी हा प्रभाग शहरात अति महत्वपूर्ण प्रभाग आहे यात मेडिकल कॉलेज, मध्यवर्ती बस स्थानक, रेल्वे स्टेशन, गांधी सागर, फुले मार्केट, गुरुदेव सेवा मंडळ, गीता मंदिर इत्यादी महत्वपूर्ण स्थान आहेत, तेव्हा तितक्याच प्रभावीपणे यांचा विकास घडवून आणणे, तसेच नाविन्यपूर्ण प्रकल्प उभारुन यांचे महत्व अजून वाढवावे, प्रभागातील वेळो वेळी निर्माण होण्याऱ्या समस्यांचे निराकरण करून नागरिकांना न्याय देण्याचा प्रयत्न करावा, तिनही अतिथींनी महानगरपालिकेच्या त्यांना आलेल्या अनुभवातुन उचित मार्गदर्शन केले. आणि सर्वांच्या हातुन नागरिकांची सेवा घडावी अशी कामना व्यक्त केली. समारंभाचे प्रास्ताविक रामदास टेकाडे यांनी केले तर संचालन दिलीप सुरकार व आभार राजेश कुंभलकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला ज्ञानेश्वर रक्षक, प्रभाताई ठवकर, राजु पवार, डॉ.कोबांडे, विजय कदम, निरज चौबे, संजय शिंदे, नरेश खडसे प्रभाग १७ चे बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.



## जनसेवा किराणा असोसिएसन तर्फे शरबत वाटप

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

मौदा- रन फॉर मौदा नगरपंचायत मौदा तर्फे रविवारी सकाळी 6 वाजता तिडके कॉलेज रोड ते छत्रपती शिवाजी महाराज महाराज चौक पर्यंत भव्य मॅराथान स्पर्धा घेण्यात आली. तालुक्यातील लहान, मोठे व्यक्ती व शाळकरी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने भाग घेतला. या प्रसंगी नगर पंचायत मौदा येथील जनसेवा कीराणा असोशिएशन मौदा कडून भव्य शरबत वितरणाचे आयोजन करण्यात आले. यावेळी सर्व स्पर्धक व जनतेने या शरबत चा आनंद घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जनसेवा किराणा असोशिएयन चे अध्यक्ष शुभम नाकाडे, उपाध्यक्ष विपूल मानकर, सचीव राजेंद्र पिसे कोषाध्यक्ष विनोद मेहर,कार्याध्यक्ष मुन्ना जुनगडे मानकर मॅडम रमेश मस्के, राजेंद्र जैसवाल, महली पंचबुधे, रौनक भैसवर, नाना धांडे, कामदेव दुबे, भोंगाडे, बावनकुळे व इतर पदाधिकारी यांनी मेहनत घेतली.

## परमात्मा एक आश्रमात रोषणाईने अतिशय सुंदर व प्रसन्न वातावरण ...

### महाणत्यागी बाबा जुमदेवजींच्या जीवनावर उत्कृष्ठ कलाप्रदर्शनी...आज मौदा आश्रम येथे वनकार्य, झेंडावंदन व भव्य सेवक मेळावा...

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

मौदाः परमपूज्य परमात्मा एक सेवक मंडळ नागपूर अंतर्गर परमात्मा एक सेवक मानव धर्म आश्रम पावदौना, मौदा येथे आज (ता २६) सोमवारला हवनकार्य, झेंडावंदन व भव्य सेवक मेळावा आयोजित केला आहे. भव्य सेवक मेळाव्या निमित्त आठवड्यापासून करण्यात आलेली रोषणाई अतिशय सुंदर व प्रसन्न वातावरण निर्माण करणारी आहे. रोषणाईमुळे संपूर्ण आश्रम परिसर अधिक उजळ, स्वच्छ आणि आनंददायी दिसत आहे. येथे येणाऱ्या सेवकांना व सकारात्मक ऊर्जा व समाधानाची भावना मिळते. कार्यासाठी श्रमदान घेणाऱ्या सर्व सेवक-सेविकांचे योगदान आहे महाणत्यागी बाबा जुमदेवजींच्या जीवनावर उत्कृष्ठ कलाप्रदर्शनी... महाणत्यागी बाबा जुमदेवजींच्या जीवनावर आधारित उत्कृष्ठ कळप्रदर्शनी करण्यात आली. यात बाबांचा विनकारांचा व्यवसाय,भगवत प्राप्तीचा मार्ग सापडला, बाबांचा संदेश, बाबांचा बैलबंडी दौरा,मोगरकसा तलाव,मानव मंदिर असे अनेक प्रशंग हुबेहूब दाखवण्यात आले. प्रथम द्वितीय व तृतीय बक्षीस व इतर झाकिंना उत्कृष्ठ बक्षीस देऊन सन्मानित करण्यात येणार असे मंडळाचे सचिव किरण राऊत यांनी सांगितले. भव्य सेवक मेळाव्याकरीत्ता भव्य मंडप (डोम).... भव्य सेवक मेळाव्यात येणाऱ्या सेवकांसाठी भव्य मंडप (डोम) ची व्यवस्था करून १०० मंडप लावण्यात आले जेणेकरून सेवकांची गैरसोय होणार नाही. मंडळाच्या वतीने ठिकठिकाणी स्वयं स्वयंसेवक नेमण्यात आलेले आहेत. १०० एकर जागेमध्ये पार्किंगची व्यवस्था केलेली आहे ठीक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. असे मत मंडळाचे अध्यक्ष रवींद्र गायधने यांनी दर्शवले. औषपचार व अग्निशमनची व्यवस्था.....

आश्रम येथे प्राथमिक स्वास्थ आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालय मौदा तर्फे तीन ठिकाणी दोन बेडची आरोग्य व्यवस्था करण्यात आली आहे. सिसिटीव्ही कॅमेरा च्या निगराणीत... भव्य सेवक मेळाव्यात सेवकनं सोबतच इतरही लोक येत असतात. त्यामुळे कोणत्याही सेवकांना हानी होऊ नये, सेवकांचे दागिने चोरी जाऊ नये, सेवकांची भीड होऊ नये, पार्किंगची व्यवस्था व्यवस्थित व्हावी ह्याकडे पोलीस विभागाचे सिसिटीव्ही कॅमेराच्या माद्यमातून निगराणीत राहणार आहे. उड्डाण पुलाचे नामकरण सोहळा... मौदा बायपास वरून महामार्ग ५३ वर बनविण्यात आलेल्या उड्डाणंपूलाला परमात्मा एक सेवक मानव धर्म आश्रम उड्डाण पूल नाव देण्यात आले.



# संवैधानिक नैतिकतेचा अभाव : लोकशाहीचा हुकूमशाहीकडे प्रवास...!

आज २६ जानेवारी, २०२६, भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन. याच दिवशी १९५० साली संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली आणि भारत सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य झाला. या गणराज्य दिनाच्या निमित्ताने संविधानाचे शिल्पकार आणि स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संविधान सभेचे अध्यक्ष आणि भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद, भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आणि संविधान सभेचे सर्व सदस्य यांना कोटी कोटी प्रणाम आणि समस्त भारतीयांना मनःपूर्वक सदिच्छा.

प्रस्तावना:

देशात संविधानाच्या अंमलबजावणीला ७५ वर्षे पूर्ण झाली असतांनाही लोकांमध्ये लोकशाही रुजली नसून तिची मूल्ये लोकांच्या जगण्याची आधारभूत तत्त्वे होऊ शकली नाहीत. उलट लोकशाही मूल्यांना पायदळी तुडवून देशात जाती, धर्म, विषमतेच्या भिंती अधिक मजबूत होत आहेत. याची अनेक कारणे असली तरी "संवैधानिक नीतिमत्तेचा" अभाव हे सर्वात महत्त्वाचे कारण आहे. म्हणून या दिनाच्या निमित्ताने त्याबाबत चिंतन व्हावे या हेतूने सदर लेख प्रपंच.

संवैधानिक नैतिकता अर्थ व महत्त्व :

सामान्यातः "संवैधानिक नैतिकता" म्हणजे संविधानातील तत्त्वांचे आणि मूल्यांचे पालन करणे होय. यामध्ये केवळ कायदेशीर नियमांचे पालन करणे अभिप्रेत नसून संवैधानिक चौकटीतील न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता या मूल्यांचा आदर करणे आणि त्यानुसार नागरिक म्हणून आचरण करणे समाविष्ट आहे."

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेसमोर संविधानाचा मसुदा सादर करण्यापूर्वी दिनांक ४ नोव्हेंबर, १९४८ रोजी जे भाषण केले ते फार महत्त्वाचे आहे. या भाषणात त्यांनी ग्रीसचा इतिहासकार ग्रोट यांचा दाखला देऊन संवैधानिक नीतिमत्तेचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

त्यांनी या भाषणात सांगितले की, ग्रोट म्हणतो, "केवळ विशिष्ट वर्गातील बहुसंख्य लोकांनीच नव्हे तर सर्वांनी घटनात्मक नैतिकतेचे पालन करणे ही स्वतंत्र आणि शांततामय शासनासाठी अनिवार्य अट आहे."

ग्रोटच्या मते घटनात्मक नैतिकता म्हणजे, "संवैधानिक तत्त्वांबद्दल सर्वोच्चप्रतिचा आदरभाव ठेवून, कायद्याच्या निश्चित चौकटीत राहून काम करणाऱ्या शासनांच्या आदेशाचे पालन करतांना, स्वतःची मते आणि कृती मुक्तपणे व्यक्त केली पाहिजे आणि जनतेशी संबंधित निर्णयांच्या अनुषंगाने सत्ताधाऱ्यांवर संयमित टीका केली पाहिजे. हे करीत असतांना विविध पक्षांच्या चढाओढीतील कटुता स्वाभाविक असली तरी संवैधानिक तत्त्वांबद्दलचा आदर आपल्याइतकाच विरोधकांच्याही मनात आहे असा विश्वास देशातील प्रत्येक नागरिकांच्या मनात रुजणे होय."

भारतातील संवैधानिक

नैतिकतेचे वास्तव:

भारतात संविधानाने लोकशाही शासनव्यवस्था निर्माण झाली आहे. त्यामुळे लोकशाही यशस्वी होण्यासाठी संवैधानिक नीतिमत्ता अत्यंत महत्त्वाची आहे. म्हणूनच २५ नोव्हेंबर, १९४९ रोजी मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने आपले संविधान सभेतील समारोपीय भाषण करतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान व संविधानाने निर्माण केलेल्या लोकशाही बाबत चिंता व्यक्त करतांना म्हटले होते की, "संविधान कितीही चांगले असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते जर अप्रामाणिक असतील तर ते वाईट ठरल्याशिवाय राहणार नाही. तसेच संविधान कितीही वाईट असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते जर प्रामाणिक असतील तर ते चांगले ठरल्याशिवाय राहणार नाही." याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, देशाचे नागरिक, कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायपालिका आणि राजकीय पक्षातील लोकं संविधानाची अंमलबजावणी किती प्रामाणिकपणे करतात यावरच लोकशाहीचे भवितव्य अवलंबून असते. म्हणून त्यांनी संवैधानिक नीतिमत्तेला फार महत्त्व दिले आहे. ते म्हणतात, "संवैधानिक नैतिकता ही नैसर्गिक भावना नाही. तिची जोपासना करावी लागते. अजूनही आपल्या लोकांमध्ये ती निर्माण झाली नाही आपण हे समजले पाहिजे. भारतातील लोकशाही ही भारताच्या मातीवरील केवळ वरचे आवरण आहे. ही माती मूलतः अलोकतांत्रिक आहे."

आजच्या लोकशाहीच्या वास्तव स्थितीचा विचार केल्यास असे दिसून येते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला इशारा किती दूरदृष्टीचा होता. मात्र आम्ही त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळेच लोकांमध्ये अजूनही संविधानातील मूल्ये रुजली नसून लोकं कायदा व संविधान पायदळी तुडवून मनमानी करत आहेत.

लोकशाहीचा हुकुमशाहीकडे प्रवास:*

आपल्या देशातील लोकशाहीचे विधिमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायपालिका आणि माध्यमे हे चार स्तंभ आहेत. हे चार स्तंभ मिळून लोकशाही व्यवस्थेला आधार देतात आणि तिचे योग्य कामकाज सुनिश्चित करतात. मात्र अलिकडील काळात या चारही स्तंभातील लोकांमध्ये संवैधानिक नैतिकतेचा अभाव वाढला असून संविधानातील मूल्ये पायदळी तुडविण्याची वृत्ती दिसून येते. त्यामुळे राजकीय पक्ष देशापेक्षा आपल्या पक्षाची विचारधारा श्रेष्ठ मानत आहेत. संविधानातील धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाला विरोध करून देशाला हिंदू धार्मिक राष्ट्र करण्याचे घोषित करून इतर धर्मीयांमध्ये भीती व दहशत निर्माण केली जात आहे. समाजवादी म्हणजे कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेला तिलांजली देऊन भांडवलशाही अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी सर्वत्र खाजगीकरण केले जात आहे.

सामाजिक न्याय व समतेचे तत्त्व नाकारून जाती धर्माच्या भिंती मजबूत करून उच्चनीचता व अस्पृश्यता पाळली जात आहे. मनुस्मृतीच्या विषमतावादी व्यवस्थेची पकड घट्ट करण्यासाठी न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या लोकशाही मूल्यांची अवहेलना करून जातीयता व धर्मांधता वाढविली जात असून देशाची एकता व एकात्मता धोक्यात आणली जात आहे.

संविधानाने देशातील लोकांना दिलेल्या मूलभूत हक्कांची कुचंबना केली जात असून

अनुच्छेद १९ अन्वये लोकांना दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणण्यासाठी वेगवेगळे कायदे संमत केले जात आहेत. देशातील विरोधी व प्रादेशिक पक्ष संपवून एक पक्षीय राजकारण निर्माण करण्याचा प्रयत्न होत असून "एक देश, एक निवडणूक" असा नारा दिला जात आहे. देशातील सत्ताधारी पक्ष निवडणूक आयोग, सर्वोच्च न्यायालय, प्रशासन आणि इतर संवैधानिक संस्थांवर आपला प्रभाव निर्माण करण्यासाठी संसद सर्वश्रेष्ठ आहे, त्यामुळे संसदेचे कायदे रद्द करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला नाही असे म्हणत आहेत. म्हणजे सरळ सरळ संविधानातील अनुच्छेद ५० चे उल्लंघन केले जात आहे.

लोकशाहीचा प्राण असलेल्या निवडणुका निष्पक्ष व पारदर्शक न राहता राजरोसपणे विशिष्ट घटकांना रोख रक्कम वाटून, लाडकी बहीण सारख्या फुकट्या योजनांचे आमिष दाखवून, धाकदडपशाही करून निवडणुका जिंकण्यासाठी आचारसंहितेचे उल्लंघन होत आहे मात्र निवडणूक आयोग मुग गिळून बसले आहे. ईव्हीएम वर लोकांचा विश्वास नाही तरीही निवडणुका बॅलेट पेपरवर घेण्याचे धाडस निवडणूक आयोगाकडे नाही.

एकूणच काय तर वर वर दिसणाऱ्या लोकशाहीची हुकुमशाही कडे वाटचाल सुरू आहे. अशा परिस्थितीत लोकशाही टिकवायची असेल व ती वृध्दिंगत करायची असेल तर लोकांनीच पुढाकार घेतला पाहिजे, अन्यथा देशात एक पक्षीय हुकूमशाही राजवट मजबूत होईल आणि सामान्य बहुजनांना गुलामसारखे लाचारीचे जीवन जगणे भाग पाडले जाईल हे निश्चित.

जय भारत, जय संविधान, लोकशाहीचा विजय असो...!

**प्रा. डॉ. एम.आर.इंगळे***
सेवानिवृत्त प्रोफेसर आणि संविधान प्रचारक तथा विभागीय सचिव डाटा
अकोला

# अधिकारांच्या उत्सवात 'कर्तव्याचे' भानच ठरेल राष्ट्रनिर्मितीचा पाया !

प्रस्तावना : २६ जानेवारी १९५० रोजी भारताने संविधानाचा स्वीकार केला आणि भारत एक सार्वभौम, प्रजासत्ताक राष्ट्र बनले. दरवर्षी हा दिवस आपण मोठ्या दिमाखात साजरा करतो. संविधानाने आपल्याला प्रगत लोकशाहीतील सर्वश्रेष्ठ 'अधिकार' दिले आहेत; मात्र आज ७ दशकांनंतर आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे की, आपण अधिकारांचा उपभोग घेताना आपल्या 'कर्तव्यांना' न्याय दिला आहे का? राष्ट्र केवळ कागदी कायद्यांनी नाही, तर नागरिकांच्या कर्तव्यभावनेने समृद्ध होते. अधिकारांचा आग्रह धरणारा नागरिक स्वतःपुरता विचार करतो, पण कर्तव्याचे पालन करणारा नागरिक हा 'राष्ट्रकेंद्रित' असतो. म्हणूनच आजच्या जागतिक परिस्थितीत अधिकारांपेक्षा कर्तव्याला प्राधान्य देणे, ही काळाची गरज बनली आहे.

जागतिक संघर्ष आणि भारतापुढील आव्हाने : आज संपूर्ण विश्व तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहे. रशिया-युक्रेन असो वा इस्त्रायल-हमास संघर्ष, जगातील अस्थिरतेचा परिणाम भारतावरही होत असतो. आजचे युद्ध केवळ सीमेवर बंदुकीने लढले जात नाही, तर ते 'हायब्रीड वॉर'च्या स्वरूपात आपल्या घरात शिरले आहे. सायबर हल्ले, आर्थिक युद्ध, सांस्कृतिक आक्रमणे, अमली पदार्थांची तस्करी आणि अर्बन नक्षलवादासारखी अंतर्गत आव्हाने आपल्या समोर उभी आहेत. या छुप्या आघाड्यांवर लढण्यासाठी केवळ सैन्य पुरेसे नाही, तर प्रत्येक नागरिकाचे सतर्क राहणे आवश्यक आहे. ही सतर्कता म्हणजे दुसरे तिसरे काही नसून आपले 'राष्ट्रीय कर्तव्य' आहे.

आत्मनिर्भर भारत आणि आर्थिक कर्तव्य : देशाची अर्थव्यवस्था बळकट करणे हे केवळ सरकारचे काम नसून ते नागरिकांचे कर्तव्य आहे. 'आत्मनिर्भर भारत' ही संकल्पना यशस्वी करण्यासाठी स्वदेशी उत्पादनांचा आग्रह धरणे, करप्रणालीचे प्रामाणिक पालन करणे आणि राष्ट्रविरोधी शक्तींच्या आर्थिक नाड्या आवळणे आवश्यक आहे. जेव्हा आपण परदेशी वस्तूंच्या जागी स्वदेशी वस्तू निवडतो, तेव्हा आपण अप्रत्यक्षपणे भारताच्या संरक्षण व्यवस्थेला आणि अर्थव्यवस्थेला बळकट करत असतो. "प्रत्येक नागरिक एक सैनिक" या भावनेतून केलेली प्रत्येक छोटी कृती राष्ट्रनिर्मितीला हातभार लावते.

राष्ट्रध्वजाचा सन्मान : श्रद्धेचा की केवळ सवयीचा? : प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी आपण तिरंग्याला वंदन करतो; परंतु त्या सन्मानाचे सातत्य किती काळ टिकते? २६ जानेवारीच्या दुपारीच रस्त्यांवर, कचराकुंडीत किंवा नाल्यात प्लास्टिकचे आणि कागदी राष्ट्रध्वज पडलेले दिसतात, हे पाहून कोणत्याही राष्ट्रप्रेमी नागरिकाचे हृदय पिळवटून निघते. अनेकजण उत्साहाच्या भरात राष्ट्रध्वजाच्या रंगाचा केक कापतात किंवा कपड्यांवर, चेहऱ्यावर तिरंगा रंगवतात. हा राष्ट्रध्वजाचा घोर अपमान आहे.

ध्वजसंहितेचे (Flag Code of India) पालन करणे हे आपले कायदेशीर आणि नैतिक कर्तव्य आहे. तसेच, काही आंतरराष्ट्रीय संकेतस्थळांवर भारताचा नकाशा चुकीचा दाखवला जातो, ज्यात काश्मीर किंवा अरुणाचल प्रदेशचा भाग वगळला जातो. अशा वेळी केवळ मूकदर्शक न राहता, संबंधित संस्थेला पत्र लिहून किंवा कायदेशीर मार्गाने निषेध नोंदवून तो नकाशा दुरुस्त करून घेणे, हे आपले जागरूक नागरिक म्हणून पहिले कर्तव्य आहे.

प्रजासत्ताक दिनी नागरिक म्हणून काय करावे? : प्रजासत्ताक दिन म्हणजे केवळ सुट्टीचा दिवस नव्हे, तर तो 'कर्तव्य संकल्प' करण्याचा दिवस आहे. त्यासाठी खालील कृती आपण अवश्य कराव्यात :

. प्लास्टिकच्या ध्वजांचा वापर पूर्णपणे टाळावा आणि राष्ट्रध्वजाचा कुठेही अवमान होत असल्यास तो धैर्याने रोखावा. ध्वज संहितेचे पालन करावे

२. केवळ ठराविक नेत्यांचीच नव्हे, तर देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या असंख्य ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांचे चरित्र अभ्यासावे आणि त्यांचे मूल्य संस्कार पुढच्या पिढीला द्यावेत. यातून क्रांतिकारकांचे स्मरण करावे

३. केवळ अधिकार मागण्यासाठी नव्हे, तर शिस्तबद्ध नागरिक म्हणून रहदारीचे नियम पाळणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि भ्रष्टाचाराला विरोध करणे हा देखील प्रजासत्ताक दिनाचा सन्मानच आहे. यातून संविधान आणि नियमांचा आदर राखावा.

४. आपली संस्कृती, भाषा आणि राष्ट्रप्रतीकांचा (राष्ट्रगीत, वंदे मातरम्) सन्मान राखणे आणि त्याचा अवमान करणाऱ्यांना प्रबोधन करणे हे आपले कर्तव्य आहे.

ज्या देशाचा नागरिक आपल्या अधिकारांपेक्षा कर्तव्याला श्रेष्ठ मानतो, तो देश जगात अजिंक्य ठरतो. स्वातंत्र्य मिळवून देणे ही क्रांतिकारकांची जबाबदारी होती, पण ते स्वातंत्र्य टिकवणे आणि समृद्ध करणे ही आपली जबाबदारी आहे. या प्रजासत्ताक दिनी आपण संकल्प करूया की, "मी केवळ माझ्या हक्कासाठी लढणारा नागरिक न राहता, राष्ट्राच्या सन्मानासाठी अखंड कार्यरत असणारा 'सैनिक' बनेन."

जय हिंद ! जय भारत !

संकलक -
**श्री. रमेश शिंदे**
, राष्ट्रीय प्रवक्ते, हिंदु जनजागृती समिती




# आम्ही भारताचे लोक...!

प्रत्येक भारतीयांच्या आयुष्यात 26 जानेवारी हा दिवस अतिशय अभिमानाचा आणि सन्मानाचा आहे. खऱ्या अर्थाने या संपूर्ण विश्वाला लोकशाही प्रणालीची ताकद किती मजबूत आणि कणखर असते हा दर्शविण्याचा अभिमान दिवस म्हणजेच आपला '26 जानेवारी प्रजासत्ताक दिवस'. संपूर्ण विश्व आपल्या भारतीयांच्या या लोकशाही तत्वाची जादू बारकाईने न्याहाळते. भारत इंग्रजांच्या गुलामीतून स्वातंत्र्य झाल्यानंतर देशाची सुदृढ आणि मजबूत वाटचाल करण्यासाठी देशातील थोर विचारवंतांना समाजसुधारकांना एकत्र आणून त्यांच्यावर देश यशस्वी व सुरळीत चालवण्यासाठी सशक्त स्वयंभु अशी संविधान निर्मिती करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आणि पाहता पाहता दोन वर्ष 11 महिने 18 दिवसांत सलग प्रत्येक कलमांवर, प्रत्येक गोष्टींवर, देशाच्या भौगोलिक, धार्मिक सामाजिक परिस्थितीचा विचार करून अवघ्या विश्वासमोर 'समग्र आणि समृद्ध' असे देशाचे संविधान निर्माण करण्यात आले.

अन हे संविधान संपूर्ण देशासाठी आजच्या दिवशी लागू करण्यात आले. त्याचे प्रतिक म्हणून या दिवसाचे जगावेगळे महत्त्व देशाच्या कानाकोपऱ्यात दिसून येते. देशाची स्वयंसिद्ध राज्यघटना जनतेला समर्पित करुन संपूर्ण राष्ट्राला 'एक नवी उर्जाच' प्रदान केली. जणू माणसा-माणसात '26 जानेवारी' च्या रूपातून जगावेगळी संजीवनीच प्राप्त झाली आहे म्हणून या दिवसाचे अनन्यसाधारण असे महत्त्व दिसून येते. ज्यातून भारतीय जीवनाच्या साऱ्या वाटा सहजरीत्या सोप्या झाल्या. 'आम्ही भारताचे लोक भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा.....' या ओळी मोठ्या अभिमानाने समस्त भारतीयांच्या हृदयातून हृदयाला जोडण्याचे किंबहुना एकसंघ ठेवण्यासाठी प्रेरक शक्ती ठरला आहे.ज्यातून राष्ट्राची विविधता, एकता लोकशाही अनं अस्सल मानवता जगाच्या कड्याकपारी सोज्वळ असण्याची दरवळ पसरवते. प्रास्ताविकेच्या प्रत्येक शब्दातून भारतीयाबद्दलचा अभिमान, गौरव अन व्यापकता संपूर्ण विश्वाला लक्षात येते. या प्रास्ताविकेतून देशाची समृद्धता किती विशाल आहे याची प्रचिती विश्वाच्या कानाकोपऱ्यात असणाऱ्या देशादेशांना जाणवते. याच समृद्धतेच्या आधारे देशाची वाटचाल अगदी परिपूर्ण होत आहे. भारतात सामान्य माणसाला जगण्याचा, विचार व्यक्त करण्याचा अधिकार किती रीध्द आहे जणू सामान्य जनतेला आपुलकीचे एक छत्रच यारुपातून लाभले असा हा अभिमान दिवस म्हणजेच आपल्या सर्वांचा 'प्रजासत्ताक दिन' होय.26 जानेवारी हा दिवस आपण समस्त भारतीय मोठ्या अभिमानाने साजरा करतो...! हे जरी वास्तव असलं तरी या दिनाची गरिमा आपण सर्वांनी तितकीच कायम राखली का..? प्रजासत्ताक दिन हा देशाची लोकशाही मुल्ये, लष्करी सामर्थ्य अनं सांस्कृतिक विविधता दर्शवते पण यातील जनतेच्या रक्षणाच्या हिताने आज खरंच जनतेपासून ते राजकीय पुढाऱ्यां पर्यत लोकशाही ची मूल्ये जोपसली जातात का..? आपल्या राजकीय हेतूना साध्य करण्यासाठी सामान्य जनतेच्या हितांना अखंड राखल्या जातात का..? याचा विचार करणेही आज आवश्यक झाले आहे. ज्याचे मुळच "लोकशाही" आहे ते मूळ राजकीय पक्षांच्या हितासाठी पोकळ झाले असेल तिथे लोकशाही ची मूल्ये आपली दरवळ कशी दरवळेल..? याचा एक भारतीय नात्याने विचार करणे आवश्यक आहे. जनतेला समर्पित अनं स्वाधीन झालेला हा दिवस जनतेच्या हिताला रक्षण करण्यासाठी आपण सर्व मोठ्या अभिमानाने संपन्न करतो पण खरंच आपण सर्व प्रजासत्ताक आहोत का? आज या ठिकाणी देशाची ७७ वर्षाची वाटचाल झाल्यानंतर आपण अभिमानाने सांगू शकतो का,की सामान्य माणसाचे हित खऱ्या अर्थानं जोपासल्या जाताहेत..! त्याला न्याय दिल्या जाताहेत...! देशाच्या कानाकोपऱ्यातील मग तो शेतकरी असो, शिक्षकबांधव असो, छोटे मोठे व्यापारी असो किंवा मोलमजुरी करणारा मजूर वर्ग असो या आधारस्तंभ असणाऱ्या घटकांचे अस्तित्व जोपासले गेले आहे का..? आज सारंचकाही आपलंच असूनही अनेक बाबतीत आपण...अधिकारांनी अनं हितांनी पोकळीत भरल्यागत होत आहोंत अनं राजकारण्यांच्या राजकीय डावपेचात होरपळल्या जात आहोत. प्रास्ताविकेचे वाचन करताना शब्दांमध्ये राष्ट्रीयत्वाची सहजता येऊन जाते परंतु त्यातल्या 'प्रत्येक शब्दाला अनं विशालतेला' राजकीय विचारातून अनं कर्तव्यातून सांभाळताना लोक पुढाऱ्यांची कुठेतरी दमछाकी झालेली दिसून येते मग असा फरक का...?असा भेद का..? आपल्या महाराष्ट्र राज्यात शिक्षकांमध्ये दुफळी निर्माण झालेली आहे. राजकीय पोळी शेकण्यासाठी शिक्षकांवर गदारोळ आणणाऱ्या परीक्षांचे माध्यम उभारले आहेत. शेतकरी वर्गात सुद्धा असंतोषाचे वातावरण दिसून येते. शेतीमालाला योग्य भाव नाही..! शेतीमाल विकण्यासाठी हक्काची बाजारपेठ नाही..! विकतांना दलालांचे व्यापारांचे मोठे संघटन दिसून येते आणि सोन्यासारख्या शेतमालाला कवडीमोल विकावे लागते..! यासारखे अनेक अनुकूल प्रतिकूल विचार न्यायसंगतेच्या प्रतिक्षेत उभे असलेलें जाहते. मग आपल्याला खऱ्या अर्थाने 'प्रजासत्ताक आहोत' असे म्हणता येईल का... याचा अर्थ उमजून घेऊन आपल्या सर्वांना प्रजासत्ताक च्या अस्तित्वासाठी केवळ तिरंगी ध्वजेलाच मानवंदना देऊन चालणार नाही तर देशांचे नेतृत्व करणाऱ्यांच्या मनातही सामान्यांच्या हितांच्या 'विचार ध्वजाचे तोरण' लावणे काळाची गरज झाली 1आहे किंबहुना यातच लोकशाहीचे सौख्य सामावले आहे.....

**विशाल देवतळे**
मु हिंगणा जि नागपूर
९७६४९१५१७५




# भारत बलशाली होईल

स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन हे दोन आपले राष्ट्रीय सण आहेत. हे दोन्ही राष्ट्रीय सण संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहात साजरा केले जातात. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच जण या दिवशी तिरंग्याला मानवंदना देऊन देशाप्रती कृतज्ञता व्यक्त करीत असतात ; पण दुर्दैवाने अनेक लोकांना स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन यातील फरक सांगता येत नाही.

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. इंग्रजांच्या दिडशे वर्षाच्या गुलामीतून भारत स्वातंत्र्य झाला. देश स्वातंत्र्य झाला तेव्हा आपल्या देशाला स्वतःचे संविधान नव्हते. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपल्या देशाचे कायदे हे भारतीय राज्यशासनाच्या १९३५ सालच्या कायद्यावर ( कलमावर ) आधारित होते. स्वतंत्र देशाला स्वतःचे संविधान असावे. त्या संविधानात देशाचा कारभार कसा चालवायचा या संबंधी नियम व कायदे असावेत तसेच नागरिकांचे हक्क व कर्तव्याचा देखील त्यात समावेश असावा असे सर्वांचे मत होते.

हे संविधान तयार करण्याचे शिवधनुष्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारख्या विद्वानाने पेलावे असे आव्हान करण्यात आले. तेव्हा देशाचे संविधान तयार करण्याचे आव्हान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वीकारले. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र भारताचे संविधान तयार करण्यासाठी मसुदा समिती नेमण्यात आली. या संमतीने संविधानाचा मसुदा तयार करून तो ४ नोव्हेंबर १९४७ रोजी सभेपुढे सादर केला. या सभेने सार्वजनिक चर्चेसाठी सभागृहात हा प्रस्ताव १६६ दिवस खुला केला.

डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या नेतृत्वाखालील समितीने दोन वर्ष, अकरा महिने आणि अठरा दिवसात संविधानाचा मसुदा तयार केला. बरेचसे विचार विमर्श आणि सुधारणा केल्यावर २४ जानेवारी १९५० रोजी विधानसभेच्या ३०८ सदस्यांनी हा मसुदा मान्य केला. संविधानाच्या दोन हस्तलिखित प्रति तयार करण्यात आल्या. इंग्रजी व हिंदी भाषेत या प्रति होत्या. दोन दिवसांनी म्हणजे २६ जानेवारी १९५० पासून या संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली आणि भारत प्रजासत्ताक राष्ट्र बनले.

संविधानाने आपल्याला मूलभूत हक्कांसोबत मूलभूत कर्तव्ये देखील दिली आहेत. हक्क आणि कर्तव्ये एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आपण जितके हक्कांबाबत जागरूक असतो तितके आपण आपल्या कर्तव्याबाबत जागरूक नसतो. जर देशातील प्रत्येक नागरिकाने आपल्या संवैधानिक हक्कांसोबत संवैधानिक कर्तव्ये देखील प्रामाणिकपणे बजावली तरच भारत बलशाली होईल !

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

# प्रजासत्ताक दिन म्हणजेच स्वतंत्र भारताची नियमावली.

२६ जानेवारी संविधानाचा व नियमांचा आधारस्तंभ आहे.१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. परंतु स्वातंत्र्यानंतर संविधान, देशाची नियमावली असने गरजेचे असते.कारण कोणत्याही कार्याकरीता पुढे पाऊल टाकण्यास कायद्याच बंधन असने आवश्यक आहे.२६ जानेवारी १९५० रोजी देशाची राज्यघटना लागु झाली.त्यानिमित्याने भारतातील प्रत्येक नागरिक मोठ्या उत्साहाने प्रजासत्ताक दिन साजरा करीत असतो. कारण प्रजासत्ताक म्हणजे लोकांव्दारे लोकांसाठी प्रस्थापित केलेले शासन. भारतात जात,धर्म, पंथ,वंश, गरीब-श्रीमंत, व्देष या संपूर्ण गोष्टी बाजूला ठेवून गुण्या-गोविंदाने प्रजासत्ताक दिवस वेगवेगळ्या संस्कृतीच्या माध्यमातून मोठ्या उत्साहाने साजरा करतात. २६ जानेवारी १९५० रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची लॉर्ड माउंट बॅटन(गव्हर्नर जनरल) यांच्या जागी भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवड झाली.२६ जानेवारीच्या निमित्ताने दरवर्षी राष्ट्रपतींच्या हस्ते दिल्लीतील राजपथावर राष्ट्रध्वज फडकवला जातो. आपण ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा करीत आहोत.मुख्यत्वे करून २६ जानेवारीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली राज्यघटना लागु करण्यात आली. त्यामुळे स्वतंत्र भारतासाठी हा मोठा आणि गौरवाचा दिवस मानल्या जातो.भारताला स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झाली असली तरी आजही देशात आपल्याला गुन्हेगारी, भ्रष्टाचार, बँक घोटाळे,झुंड बळी, जातीयवाद, हिंसाचार,यांच्याशी आजही आपण लढतोय ही स्वतंत्र भारतासाठी शोकांतिकाच म्हणावी लागेल.अशा गुन्ह्या विरूद्ध सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी एकत्र येण्याची नितांत गरज आहे. कारण देश स्वतंत्र करण्यासाठी महात्मा गांधी,भगतसिंग, राजगुरू, सुभाषचंद्र बोस, झाशीची राणी, लाला लजपतराय, लोकमान्य टिळक, चंद्रशेखर आझाद, हजारो क्रांतिकारक, मवाळवादी -जहालवादी, थोर महात्मे इत्यादीसह लाखो स्वतंत्र शुरविरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. तेव्हाच १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस उदयास आला. भारताच्या थोर महात्म्यांना भारत स्वतंत्र करण्यासाठी दोन नद्यांचा सहारा घ्यावा लागला व त्या दोन नद्यांचा उगम म्हणजे एक मवाळवादी तर दुसरी जहालवालवादी यांच्या संगमानेच भारतीय स्वातंत्र्यलढा उभा झाला. याकरिता आपल्याला १५ ऑगस्ट१९४७ उजाडण्यासाठी तब्बल १५० वर्षे वाट पाहावी लागली.१५० वर्षांच्या काळातील स्वतंत्र विरांचे बलीदान व्यर्थ जावु नये व त्यांचा सन्मान व्हावा या उद्देशाने २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना अस्तित्वात आणली.यात मुख्यत्वेकरून डॉ बाबासाहेब आंबेडकर, डॉ राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल,पंडित जवाहरलाल नेहरूसह अनेक थोर महात्म्यांचा सिंहाचा वाटा आहे.परंतु दु:खाची गोष्ट म्हणजे गेल्या ३० वर्षांपासून देशात भ्रष्टाचार, करोडोचे घोटाळे, बलात्कार, गुन्हेगारी,निवडणुकांमध्ये जातीयवाद याला मोठ्या प्रमाणात उत आल्याचे पहायला मिळते.ही शहिद विरांच्याप्रती अत्यंत दु:खद व चिंताजनक बाब आहे. आपल्या पुर्वजांनी व देशाच्या स्वतंत्र संग्राम सेनानींनी आणि बहादुर विरांनी घर-दार, परीवार या संपूर्ण गोष्टी बाजूला सारून व त्याग करून स्वातंत्र्याच्या अग्नी कुंडात उडी घेतली व लाखोंच्या संख्येने बलीदान दिले. परंतु आपली शोकांतिकाच म्हणावी लागेल की आपण भारत स्वतंत्र होऊन ७८ व्या वर्षीत पदार्पण करीत आहोत तरीही भारतातील भ्रष्टाचार थांबलेला नाही.आज भारतातील राजकीय पुढाऱ्यांजवळ, पुंजीपतीं, वॉलीउडक्षेत्र व भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांजवळ वाममार्गाने कमवीलेली करोडोंची चल-अचल संपत्ती आजही आहे. ही संपत्ती एकत्र केली तर भारताला तब्बल १० वर्षे कोणाही जवळुन कर्ज घ्यावे लागणार नाही व गरीबी आणि महागाई संपुष्टात येवु शकते आणि देश सुजलाम - सुफलाम होण्यास मोठी मदत मिळेल. याकरिता भ्रष्ट अधिकारी व भ्रष्ट राजकीय पुढारी ही देशाला लागलेली कीड आहे ही कीड जळामुळासकट नष्ट व्हायला हवी व यावर आळा बसायला हवा.आज मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती डांबुन ठेवल्याने व चलनात नसल्याने देशातील गरीब वर्ग गरीबीच्या खाईत जात आहे तर श्रीमंत वर्ग दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व देशाच्या विकासामध्ये मोठा अडथळा निर्माण होत आहे. यामुळेच देशात महागाई व बेरोजगारी मोठ्या प्रमाणात दिसून येते. भारताचे प्रजासत्ताक दिनाचे ७६ व्या वर्षाचे औचित्य साधून देशातील संपूर्ण भ्रष्टाचाऱ्यावर कठोर कारवाई करून त्यांनी वाममार्गाने कमवीलेला पैसा सरकारने आपल्या तिजोरीत जमा करावा. यामुळे देशाचा विकास, बेरोजगारीची समस्या, महागाई यावर आळा घालण्यासाठी मोठी मदत होईल व देशाचा विकास भरभराटीला येईल.याचे स्वागत आपले पुर्वज,शहीद व स्वतंत्र सेनानी अवश्य करेल व त्यांच्या स्वतंत्र लढ्याला दिलासा अवश्य मिळेल हीच प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शहिदांना खरी आदरांजली ठरेल.देशात वाढते हवामानातील बदल, प्रदूषण व ग्लोबल वार्मिंगचा धोका पहाता.प्रजासत्तक दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी. याकरीता शाळा, कॉलेज, संपूर्ण सरकारी क्षेत्र, राजकीय पुढारी, सामाजिक संघटना यांनी पुढाकार घ्यायला हवा.यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होईल व प्रदूषणावर मात करण्यासाठी मोठी मदत मिळेल. आजच्या दिवशी वृक्षलागवड झाली तर ती अनंतकाळापर्यंत सर्वांच्या हृदयात राहील व लाखो शुरविरांचे दर्शन प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व जळामुळात आपल्याला होईल. यामुळे भारतीय शहिदांची व शुरविरांची गाथा अबाध्य आहे.कारण त्यांच्या आशीर्वादानेच आपण आज मोकळा श्वास घेत आहोत. जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९,
नागपूर.

# हे किळसवाणे कोठून येते?

विनयभंग प्रकरणाने बदलापूर गुरुवारी पुन्हा एकदा हादरलं. बेकायदेशीर शाळेच्या महिला सहाय्यक नसलेल्या व्हॅनमध्ये एका चिमुकलीचा विनयभंग झाला.

साधारण दीड वर्षांत घडलेल्या दुसऱ्या विनयभंग प्रकरणाने बदलापूर गुरुवारी पुन्हा एकदा हादरलं. या प्रकराची माहिती बातम्यांमध्ये काल आल्याने संपूर्ण महाराष्ट्रात अस्वस्थता पसरली. बदलापूरमध्ये साधारण वर्ष - सव्वा वर्षापूर्वी शाळकरी मुलीच्या विनयभंगाचा दुर्दैवी प्रकार घडला होता. शाळेतल्या शिपायाकडूनच विनयभंगाचा प्रकार झाल्याने आणि शाळा प्रतिष्ठित, ख्यातनाम असल्याने पोलिसांनी गुन्हा नोंदवण्यास हयगय चालवली, तेव्हां बदलापूरकरांनी मोठ्या संख्येने रेल्वे रुळावर उतरून आपल्या भावनांना वाट करून दिली होती. त्या उद्रेकाने सगळ्या यंत्रणा वठणीवर आल्या होत्या. त्या विनयभंग प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेनंतर पोलिसांच्या गाडीत झालेल्या चकमकीत मारला गेला. त्या संपूर्ण प्रकरणाची आठवण महाराष्ट्राला काल पुन्हा एकदा झाली. गेल्या प्रकरणात शाळकरी मुलगी होती. यावेळी पूर्वप्राथमिक शाळेत, म्हणजे बालवाडीत जाणारी अवघी चार वर्षांची चिमुकली आहे. गेल्यावेळी शाळेतला शिपाई होता; यावेळी मुलांची शाळेत ने-आण करणाऱ्या खासगी व्हॅनचा चालक आहे. म्हणजे, ज्यांची व्यवस्था मुलांच्या सहाय्यासाठी आणि संरक्षणासाठी केली आहे, तेच दोन्ही प्रकरणात आरोपी आहेत! अशावेळी विश्वास कोणावर ठेवायचा, असा प्रश्न हतबल पालकांसमोर उभा ठाकल्याशिवाय राहात नाही. दोन्ही घटना बदलापुरात घडल्याने हा प्रश्न केवळ बदलापूरपुरता सीमित आहे, असा गैरसमज करून घेण्याचं कारण नाही. याची व्याप्ती पूर्ण देशभर आहे. महाराष्ट्राने; निदान महाराष्ट्राच्या शिक्षण मंत्र्यांनी आणि पोलीस महासंचालकांनी तरी याची गंभीर दखल घेतली पाहिजे. अशा घटना घडू नयेत यासाठी कडक प्रतिबंधात्मक व्यवस्था केली पाहिजे. महाराष्ट्रातल्या महानगरी, शहरी, निमशहरी, ग्रामीण-अशा सर्व ठिकाणी समान पद्धतीने लागू करता येईल, अशीच ही उपाययोजना असायला हवी. बदलापूरला आता महिला नगराध्यक्ष असल्याने त्यांनी स्थानिक पातळीवर या प्रश्नाच्या खोलात जाऊन संबंधित यंत्रणांना उपाययोजनांसाठी मदतही केली पाहिजे. कारण, या शहराची इभ्रत राखण्याची सगळ्यात पहिली जबाबदारी त्यांची आहे!बदलापुरात अगदी कमी अंतराने दोन घटना घडल्या आणि पहिल्या प्रकरणात पोलिसांनी सुरुवातीला गहाळपणा केला, अन्यथा बदलापूरचं नांव एवढं चर्चेत येण्याचं काही कारण नव्हतं. अशाच घटना यापूर्वी मुंबईत, उच्चभ्रूंच्या मानल्या जाणाऱ्या शाळेतही घडल्या आहेत. त्या प्रकारानंतर शाळेच्या बस आणि शाळेने नेमलेल्या खासगी कंत्राटदारांच्या बस याबाबत बरीच चर्चा झाली होती. विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या अशा बसमध्ये एक महिला सहाय्यक असावी, मुलांना बसमध्ये घेण्याची आणि शाळा सुटल्यानंतर त्यांना बसमधून पुन्हा पालकांच्या स्वाधीन करण्याची जबाबदारी या महिला सहाय्यकावर सोपवावी, असा तोडगा निघाला होता. त्याची अंमलबजावणीही झाली होती. मुंबईत घडलेल्या त्या घटनेचे पडसाद इतके तीव्र होते, की बसच काय; मुलांची शाळेसाठी वाहतूक करणाऱ्या व्हॅनमध्येही महिला सहाय्यकांची नेमणूक करण्यात आली होती. पण, नंतर आपल्याकडे जे घडतं, तेच झालं. काळ लोटला. प्रकरणाचं गांभीर्य कमी झालं. नवं शालेय वर्ष सुरू झालं. व्हॅनमधल्या महिला सहाय्यक गायब झाल्या आणि परवाचा प्रकार घडला! या बालिकांच्याबाबतच नाही, जगात कुठेही महिलांच्या विनयभंगाचे प्रकार घडले, अत्याचाराच्या घटना घडल्या, तर त्यातल्या बहुतांश घटनांमध्ये पुरुष नातेवाईक किंवा परिचितांपैकीच कोणीतरी आरोपी असतात, अशी सिद्ध झालेली आकडेवारी आहे. बदलापूरच्या पूर्वीच्या घटनेतला आरोपी शाळेचा शिपाई होता. परवा घडलेल्या आणि मुंबईतल्याही अलीकडच्या घटनेतले आरोपी विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी असलेल्या गाड्यांचे चालक होते. परवाच्या घटनेच्या तपशिलात पाहिलं, तर व्हॅन नेहमी बालिकेला घेऊन ज्या वेळेला येते, त्यापेक्षा बराच उशीर झाल्याने पालकांनी चौकशी केली, तेव्हा त्यानंतर पाऊण तासाने व्हॅन पोहोचली. परतलेल्या बालिकेचं वर्तन पालकांना खटकल्याने त्यांनी जेव्हा खोदून खोदून चौकशी केली, तेव्हा आक्षेपार्ह प्रकार उघडकीस आला. चालकाला शाळेत बोलावलं, तेव्हा बालिका घाबरून पालकांमागे लपली. झाल्या प्रकाराला त्यातून दुजोरा मिळाला, असं समजतं. हा संपूर्ण प्रकारच अत्यंत किळसवाणा आहे.इतक्या छोट्या मुलींचा विनयभंग होईल, असं दुष्कृत्य करावंसं संबंधित पुरुषांना का वाटत असेल? त्यांच्या मनात असं अभद्र कशातून उगवत असेल? शिक्षण क्षेत्रातले तज्ज्ञ या प्रकारांसाठी पहिले दोषी ठरवतात, ते मोबाईलमधून २४ तास स्त्रवत असलेल्या हिंसक, लैंगिक, भावना उद्दीपित करणाऱ्या 'मनोरंजना'च्या तथाकथित कार्यक्रमांना. या कार्यक्रमांतून; छोट्या छोट्या रीलमधूनही जे पोहोचतं, त्यातून अशा आक्षेपार्ह बाबींबाबतचं गांभीर्य, धाक संपून जातो. नैतिकतेचे सारे संस्कार गळून पडतात. असा एखादा कार्यक्रम किंवा रील पाहिल्या, तरी तुमच्या मोबाईलवर त्याच प्रकारचे कार्यक्रम, रील किंवा मनोरंजनाच्या तत्सम प्रकारांची रांग लागते. पाहणारा एकामागून एकात गुंतत जातो. त्यातून सगळं जग अशा विकृत प्रकारांनीच भरलं असल्याचा भास त्याला होतो. जे 'खासकरून' बनवलेलं असतं, तेच त्याला 'सर्वसाधारण' वाटू लागतं. त्यातून हे प्रकार वाढीस लागतात. साहजिकच प्रौढांपेक्षा तरुणांमध्ये, कुटुंबापासून लांब असलेल्या किंवा निवासाच्या अपुऱ्या सोयी असलेल्यांमध्ये हे प्रकार अधिक आहेत. बदलापूरमध्ये घडलेल्या दुर्घटना उघडकीस आल्या, त्याची दखल पालकांनी घेतली.

# प्रजासत्ताक दिन : अधिकारापासून कर्तव्यापर्यंत...

२६ जानेवारी हा दिवस भारतीय राष्ट्रजीवनातील अत्यंत महत्त्वाचा आणि गौरवशाली दिवस आहे. हा दिवस आपण प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो. मात्र या दिवसाचे महत्त्व केवळ ध्वजवंदन, संचलन किंवा औपचारिक कार्यक्रमांपुरते मर्यादित नाही. २६ जानेवारी १९५० रोजी भारताने स्वतःचे संविधान लागू झाले आणि भारत एक सार्वभौम, लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून जगाच्या पाठीवर उभा राहिला. त्यामुळे हा दिवस भारतीय लोकशाहीचा, स्वातंत्र्याचा आणि जबाबदारीचा उत्सव आहे.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला ब्रिटिश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळाले. परंतु हे स्वातंत्र्य टिकवण्यासाठी आणि समाजव्यवस्था योग्य दिशेने नेण्यासाठी संविधानाची आवश्यकता होती. विविध जाती, धर्म, भाषा, संस्कृती आणि परंपरा असलेल्या भारतासारख्या विशाल देशासाठी एक सुसंगत, समताधिष्ठित आणि न्यायपूर्ण राज्यघटना तयार करणे हे अत्यंत आव्हानात्मक कार्य होते. हे ऐतिहासिक कार्य भारतीय संविधान सभेने केले.

भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी जगातील अनेक देशांच्या राज्यघटनांचा सखोल अभ्यास केला आणि भारतीय समाजाच्या वास्तव परिस्थितीचा विचार करून संविधानाची रचना केली. त्यांच्या दृष्टीने संविधान म्हणजे केवळ कायद्यांचा संग्रह नव्हता,

तर तो समाजातील शेवटच्या घटकाच्या उन्नतीचा मार्ग होता. शोषित, वंचित, दलित, स्त्रिया आणि अल्पसंख्याक यांना सन्मानाचे जीवन मिळावे, यासाठी त्यांनी संविधानात सामाजिक न्यायाची ठोस मांडणी केली.भारतीय संविधानामुळे नागरिकांना मूलभूत अधिकार प्राप्त झाले. समानतेचा अधिकाराने जात, धर्म, लिंग यावर आधारित भेदभाव नाकारला. स्वातंत्र्याच्या अधिकाराने अभिव्यक्ती, विचार, संघटन आणि व्यवसाय स्वातंत्र्य दिले. धार्मिक स्वातंत्र्याने प्रत्येकाला आपला धर्म पाळण्याचा अधिकार दिला. शोषणाविरुद्धच्या अधिकाराने मानवी प्रतिष्ठेचे संरक्षण केले. हे अधिकार भारतीय नागरिकाला केवळ स्वतंत्र नाही तर सशक्त बनवतात.

आपण सर्व भारतीय आहोत ही भावना प्रत्येकाच्या मनामध्ये दृढपणे रुजणे ही आजच्या काळाची मोठी गरज आहे. भारतीय संविधानाने जात, पंथ, धर्म, लिंग यावर आधारित कोणताही भेदभाव मान्य केलेला नाही. मात्र दुर्दैवाने आजही ग्रामीण भागातच नव्हे तर शहरी भागातसुद्धा अनेक ठिकाणी सामाजिक भेदभावाचे प्रकार दिसून येतात. हे प्रकार संविधानाच्या मूल्यांना आणि भारतीय लोकशाहीच्या आत्म्याला छेद देणारे आहेत. समानतेचा अधिकार कागदावर मर्यादित न राहता तो आपल्या वागण्यात उतरला पाहिजे. जातीधर्माच्या पलीकडे जाऊन माणूस म्हणून माणसाशी वागणे, हीच खरी संविधाननिष्ठा आहे. जोपर्यंत आपण भारतीय म्हणून एकत्र येत नाही, तोपर्यंत संविधानाने अपेक्षित केलेला समताधिष्ठित समाज साकार होऊ शकणार नाही.

संविधानाने अधिकारांसोबत कर्तव्यांचीही जाणीव करून दिली. देशाची एकता व अखंडता जपणे, संविधानाचा सन्मान करणे, सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे, सामाजिक सलोखा राखणे ही प्रत्येक भारतीयाची नैतिक जबाबदारी आहे. खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. मनाला येईल तसे वागणे, नियम मोडणे, सार्वजनिक संपत्तीचे नुकसान करणे हे स्वातंत्र्याचे लक्षण नाही.आज अनेकदा स्वातंत्र्याचा गैरअर्थ लावला जातो. शासकीय मालमत्तेची तोडफोड, रस्ते, बस, शाळा, रुग्णालये यांचे नुकसान केले जाते. ही संपत्ती कोणाची आहे

याचा विचार न करता बेपर्वाईने वागले जाते. प्रत्यक्षात ही संपत्ती शासनाची नसून ती प्रत्येक नागरिकाची आहे. माझी गोष्ट आहे म्हणून तिची काळजी घेणे आवश्यक असते, तसेच सार्वजनिक साधनसंपत्तीची काळजी घेणे हेही आपले कर्तव्य आहे.

शासन विविध योजना समाजातील दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी राबवत असते. शिक्षण, आरोग्य, निवास, रोजगार यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. मात्र केवळ पैसा मिळतो किंवा सुविधा मिळतात म्हणून खोट्या कागदपत्रांच्या आधारे योजनांचा लाभ घेण्याची वृत्ती वाढत आहे. यामुळे खरे गरजू लाभापासून वंचित राहतात. ही बाब संविधानाच्या मूल्यांना धरून नाही. प्रामाणिकपणा, सचोटी आणि नैतिकता हे संविधानाचे मूळ तत्व आहे, याचे भान प्रत्येकाने ठेवणे आवश्यक आहे.

जागतिक पातळीवर भारताची ओळख वाढत असताना प्रत्येक नागरिकाची भूमिका महत्त्वाची ठरते. भारत महासत्ता बनणार असेल तर ते केवळ भाषणातून किंवा आकड्यांतून नाही तर प्रत्यक्ष कृतीतून होईल. शिक्षण घेऊन दुसऱ्या देशात सेवा करण्यापेक्षा आपल्या देशातच प्रामाणिकपणे काम करून राष्ट्रउभारणीत योगदान देणे हे खरे देशप्रेम आहे. कौशल्य विकास, मेहनत, नवोपक्रम आणि सामाजिक बांधिलकी याच्या बळावरच भारत प्रगती करू शकतो.

"भारत माझा देश आहे" असे म्हणताना हे शब्द केवळ उच्चारापुरता मर्यादित न राहता तो आपल्या वृत्तीत उतरला पाहिजे. मी जेव्हा म्हणतो भारत माझा आहे, तेव्हा भारतातील प्रत्येक गोष्ट माझी आहे ही भावना निर्माण झाली पाहिजे. रस्ते, शाळा, पाणी, वीज, सार्वजनिक सुविधा यांची काळजी घेणे हे आपले नैतिक कर्तव्य आहे. छोट्या छोट्या कृतीतूनच मोठा बदल घडतो.

प्रजासत्ताक दिन आपल्याला संविधानाची अस्मिता जपण्याची आठवण करून देतो. संविधान हा केवळ ग्रंथ नसून तो आपल्या आचरणातून जिवंत राहणारा दस्तऐवज आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांची अंमलबजावणी आपल्या दैनंदिन जीवनात झाली तरच भारत खऱ्या अर्थाने प्रजासत्ताक राष्ट्र ठरेल.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले संविधान ही भारताच्या भवितव्याची हमी आहे. या संविधानाचा सन्मान करणे म्हणजे केवळ उत्सव साजरा करणे नव्हे तर संविधानातील मूल्ये जगणे होय. हाच प्रजासत्ताक दिनाचा खरा अर्थ आणि संदेश आहे.

**डॉ. राजेंद्र विमल रामहरी** टेकाडे
काटोल जि. नागपूर
संपर्क - ९१४५७७९०५०

दिव्य वतन हे दैनिक वृत्तपत्र प्रकाशक मालक मुख्य संपादक गोपाल आनंदराव कडुकर यांनी कार्यालय हाऊस नंबर १८ निवास सोसायटी स्वामी समर्थ मंदिर जवळ घोगली रोड बेसा तालुका जिल्हा नागपूर - ४४००३४ येथून प्रकाशित केले. संपर्क मो. ७७०९३७७५१०

# कमळाचा हिरवा देठ म्हणजे एमआयएम का ?

## सुषम अंधारेंचा इम्तियाज जलीलांना खोचक सवाल; म्हणाल्या- शिंदेंसोबत युती म्हणजे आमदारांची सदसद्विवेकबुद्धी

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

देशात आणि महाराष्ट्रात सुरू असलेल्या सध्याच्या राजकीय घडामोडींमुळे कोण कोणासोबत कधी युती करेल किंवा कोणता नेता कधी पक्ष बदलेल, याचा अंदाज लावणं कठीण झालं आहे. अशाच अनपेक्षित राजकीय समीकरणांचा अनुभव सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात पाहायला मिळतो आहे. जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपविरोधात दोन शिवसेना आणि दोन राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येऊन निवडणूक लढवत असल्याने राज्यभरात चर्चेला उधाण आलं आहे. कट्टर विरोधक असलेल्या दोन शिवसेनेला एकत्र आणण्याची कसरत बार्शीचे आमदार दिलीप सोपल यांनी केल्याचं सांगितलं जात आहे. या निर्णयामुळे अनेक नेते आणि राजकीय निरीक्षक चकित झाले असून, यावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख सुषमा अंधारे यांनी आपली स्पष्ट भूमिका मांडली आहे.

सुषमा अंधारे यांनी ठामपणे सांगितले की, बार्शीतील हा निर्णय पक्षाचा अधिकृत निर्णय नाही. तो तिथल्या आमदारांनी त्यांच्या सदसद्विवेक बुद्धीने घेतलेला निर्णय आहे. शिवसेना युबीटीची अधिकृत भूमिका वेगळी असून, या युतीला पक्षाची मान्यता नाही. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी स्वतः आमदारांशी चर्चा करणार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. आम्ही भाजपला हरवण्यासाठी जे कोणी लढत आहेत, त्यांच्या सोबत आहोत. मात्र बार्शीतील युती ही आमची युती नाही, असे ठाम शब्दांत त्यांनी सांगितले. बार्शीत पक्षाला किंवा कार्यकर्त्यांना आपली गरज भासली, तर पक्षप्रमुखांशी चर्चा करून भूमिका ठरवू, असंही अंधारे म्हणाल्या.

भाजपवर टीका करताना सुषमा अंधारे यांनी तीव्र शब्दांचा वापर केला. भाजप हा काही धुतल्या तांदळाचा पक्ष नाही, असं म्हणत त्यांनी भाजपकडे पैशाची आणि सत्तेची ताकद अधिक असल्याचा आरोप केला. त्यांच्याकडे मनी आणि मसल पॉवर असेल, पण आमच्याकडे मेंटल पॉवर जास्त आहे, असं त्या म्हणाल्या. स्वतःबद्दल बोलताना त्यांनी सांगितलं की, त्या एक साधी चळवळीतील कार्यकर्ती असून, महिला असल्याचं विक्टिम कार्ड कधीच खेळत नाहीत. सहकाऱ्यांनाही त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, मला बाई म्हणून हलक्यात घेऊ नका, घेतलंत तर अडचण होईल. मी आई-बहिणीसारखी वागते, पण संघटनेच्या कामात मी कठोर आणि ठाम आहे, असंही त्यांनी नमूद केलं.शिवसेनेत प्रथमच एका महिलेला जिल्हा संपर्कप्रमुखपद देण्यात आलं, याचा उल्लेख करत अंधारे यांनी पक्षाच्या निर्णयाचं समर्थन केलं. संघटना मजबूत करण्यासाठी जबाबदाऱ्या स्पष्टपणे दिल्या जात असल्याचं त्या म्हणाल्या. जे लोक शिवसेना सोडून भाजपमध्ये गेले, त्यांच्यावर कारवाई होणार का, या प्रश्नावर त्यांनी सूचक उत्तर दिलं. दिल्या घरी सुखी राहा, असं म्हणत त्यांनी उद्धव ठाकरे हे बागेश्वर बाबा नाहीत, असं सांगितलं.




ते एकाच वेळी सर्व ठिकाणी उपस्थित राहू शकत नाहीत. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात प्रतिनिधी नेमले असून, ते आपली जबाबदारी पार पाडत आहेत. जर कोणी ती जबाबदारी नीट पार पाडली नाही, तर आजपासूनच कारवाईची सुरुवात होईल, असा इशाराही त्यांनी दिला.

---

# मोठे आकडे नकोत, प्रत्यक्ष रोजगार दाखवा:कर्नाटक पुढे कसे गेले?, दावोस MoU वर पृथ्वीराज चव्हाणांचा सवाल

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

दावोस दौऱ्यावरून राज्य सरकार आणि विरोधकांमध्ये पुन्हा एकदा राजकीय वाद पेटला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दावोस दौऱ्यातील हजारो कोटींच्या सामंजस्य करारांवर (MoU) माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. दावोस दौऱ्यावर टीका करणे योग्य नसल्याचे मान्य करतानाच, जर खरोखर 30 लाख कोटी रुपयांचे MoU झाले असतील, तर ती आनंदाची बाब असल्याचे त्यांनी म्हटले. मात्र, केवळ मोठे आकडे सांगून जनतेची दिशाभूल करणे योग्य नसल्याचे स्पष्ट करत, सत्य शेवटी समोर येतेच, असा इशाराही त्यांनी दिला. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, राज्याच्या प्रगतीसाठी परकीय गुंतवणूक आवश्यक असली, तरी प्रत्यक्षात महाराष्ट्रात



किती उद्योग सुरू झाले, किती गुंतवणूक आली आणि त्यातून किती रोजगारनिर्मिती झाली, याचा हिशोब सरकारने द्यावा, अशी मागणी चव्हाण यांनी केली. मागील दावोस दौऱ्यात करण्यात आलेल्या MoU पैकी किती करार प्रत्यक्षात उतरले, यावर मुख्यमंत्र्यांनी श्वेतपत्रिका काढावी, असे आवाहन करत, दावोससारख्या आंतरराष्ट्रीय मंचावर स्थानिक उद्योगांशी करार करणे योग्य आहे का, यावरही त्यांनी आक्षेप घेतला. महाराष्ट्रातील बेरोजगार युवकांना इव्हेंट नव्हे, तर पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि प्रत्यक्ष रोजगार हवा आहे, असे ठाम मत त्यांनी व्यक्त केले.

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या दावोस दौऱ्यावर टीका करणे योग्य नाही. जर खरोखर ३० लाख कोटींचे MoU झाले असतील, तर आंनदाची बाब आहे. राज्याच्या प्रगतीसाठी परकीय गुंतवणूक येणे आवश्यक आहे. पण मोठे आकडे सांगून जनतेची दिशाभूल करणे योग्य नाही. कारण सत्य शेवटी बाहेर येतेच. मागील दावोस दौऱ्यातील MoU पैकी महाराष्ट्रात किती उद्योग सुरू झाले? किती गुंतवणूक झाली? प्रत्यक्षात किती रोजगार निर्माण झाले? मोठे आकडे नव्हे, तर प्रत्यक्ष गुंतवणूक व त्यातून होणारी रोजगारनिर्मिती महत्त्वाची आहे. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की,आपल्याच राज्यातील कंपन्यावरोबर दावोस मध्ये MoU करण्याबद्दल कर्नाटक सरकारच्या उद्योगम बी. पाटील यांचे निरीक्ष वाचे आहे. ते म्हणतात कि आम्ही दावोससारख्या आंतरराष्ट्रीय मंचावर कर्नाटक किंवा भारतीय कंपन्यांशी MoU करत नाही तर फक्त परकीय गुंतवणुकदारांशी करार करतो. म्हणूनच कर्नाटकात परकीय उद्योग येतात आणि कर्नाटकाचे दरडोई उत्पन्न महाराष्ट्रापेक्षा तास्त आहे. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, अडाणी आणी लोढा यांच्या सारख्या स्थानिक कंपन्याबरोबर डाव्होसमधेये करार करणे हा एक क्रूर विनोद आहे.महाराष्ट्राच्या बेरोजगार युवकांना इव्हेंट नकोत तर पारदर्शकता, उत्तरदायित्व व प्रत्यक्ष रोजगार हवे आहेत. आत्तापर्यंतच्या डाव्होस मध्ये घोषणा केलेल्या MoU वर आणि त्यांच्या कार्यकाळात महाराष्ट्रात किती मोठे परकीय उद्योग सुरू झाले यावर मुख्यमंत्री श्वेतपत्रिका काढतील का?

---

# सीआरपीएफचे उपमहानिरीक्षक प्रशांत जांभोळकर यांना विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदक

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

श्रीनगर-देशाच्या सर्वात कठीण आणि आव्हानात्मक सुरक्षा आघाड्यांवर अतुलनीय शौर्य, निष्ठा व कर्तव्यपरायणतेचे दर्शन घडवणारे केंद्रीय राखीव पोलीस दलाचे (CRPF) उपमहानिरीक्षक श्री. प्रशांत जांभोळकर यांना राष्ट्रपती पोलीस पदक (विशिष्ट सेवा) प्रदान करून गौरविण्यात आले आहे. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला जाहीर झालेल्या या सन्मानामुळे संपूर्ण देशभरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सध्या श्रीनगर येथे सीआरपीएफमध्ये सेवा बजावत असलेले श्री. जांभोळकर हे देशाच्या सुरक्षेसाठी आयुष्य झोकून देणारे कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कारकिर्दीत जम्मू–काश्मीर, ईशान्य भारत, छत्तीसगड यांसारख्या संवेदनशील भागांमध्ये त्यांनी अनेक महत्त्वाच्या मोहिमांमध्ये नेतृत्व केले आहे.



एनएसजी (ब्लॅक कॅट कमांडो) या एलिट दलाचे सदस्य म्हणून त्यांनी विशेष कामगिरी बजावली असून रॅपिड ॲक्शन फोर्स (RAF), कोब्रा बटालियन, तसेच कोसोवो येथील संयुक्त राष्ट्र शांतता मोहिमेत त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे.

त्यांच्या या धाडसी व समर्पित सेवेसाठी यापूर्वी त्यांना पोलीस पदक (उत्कृष्ट सेवा), कठीण सेवा पदक, अंटार्कटिक सुरक्षा पदक, संयुक्त राष्ट्र शांतता पदक यांसह अनेक सन्मानांनी गौरविण्यात आले आहे. त्याच गौरवशाली वाटचालीचा सर्वोच्च टप्पा म्हणजे राष्ट्रपती पोलीस पदक. सीआरपीएफमध्ये ते त्यांच्या धैर्य, प्रामाणिकपणा आणि अभिनव रणनीतींसाठी “स्पेशल ऑफिसर” म्हणून ओळखले जातात.

त्यांच्या नेतृत्वाने आणि कार्यपद्धतीने अनेक जवानांना प्रेरणा मिळाली आहे. या सन्मानाच्या घोषणेनंतर सीआरपीएफ परिवार, इतर सुरक्षा दल, माजी सैनिक तसेच देशभरातील नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा अक्षरशः वर्षाव होत आहे. सोशल मीडियावरही “राष्ट्रीय नायकाला मानाचा मुजरा” आणि “प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा क्षण” अशा प्रतिक्रिया उमटत आहेत. श्री. प्रशांत जांभोळकर यांचा हा सन्मान देशाच्या सुरक्षेसाठी झटणाऱ्या प्रत्येक जवानाच्या त्यागाचे प्रतीक असून, त्यांची सेवा भविष्यातही राष्ट्रीय सुरक्षेला अधिक बळ देईल, असा विश्वास सीआरपीएफ परिवाराने व्यक्त केला आहे.

---

# सुप्रसिध्द गोदावरी पुरस्कार २०२६ ह.भ.प. राम महाराज महाराज यांना जाहीर

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

शेवगाव - राजेंद्र मराठे दिनांक 26 जानेवारी 2026 वार सोमवार ~ राजसुद्र प्रतिष्ठाण पैठण यांच्या वतीने गोदावरी प्रकट दिनानिमित्त गोदावरी प्रकट दिन सोहळा २०२६ मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात येत आहे.

या सोहळ्यांतर्गत गंगापूजन व दीपोत्सव गोदावरी पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात येणार असून, गंगा–गोदावरी एकादशी मासिक स्वच्छता सेवा प्रकल्पालाही विशेष गौरव करण्यात येणार आहे. यंदाचा गोदावरी पुरस्कार २०२६ हा ह.भ.प. राम महाराज झिंजुर्के (श्री जोग महाराज



सेवा संस्थान, आखेगाव, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर) यांना जाहीर करण्यात आला आहे. धार्मिक सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून शहरातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.

हा सोहळा बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता, कमलातीर्थ .बाहेरील नाथ मंदिरामागे, श्रीक्षेत्र पैठण येथे संपन्न होणार आहे. कार्यक्रमास परिसरातील भाविक, नागरिक व पर्यावरणप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. गोदावरी नदीच्या पावित्र्याचे जतन, स्वच्छता व सांस्कृतिक मूल्य जपण्याचा संदेश देणारा हा सोहळा सामाजिक एकोपा व पर्यावरण संवर्धनासाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

---

# परळ एसटी डेपोत दारूच्या बाटल्यांचा खच!:परिवहन मंत्री प्रताप सरनाईकांचा संताप; अधिकाऱ्यांची कानउघाडणी

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

मुंबईतील मध्यवर्ती असलेल्या परळ एसटी डेपोला परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज अचानक भेट देऊन पाहणी केली. या पाहणी दरम्यान डेपो परिसरात ठिकठिकाणी दारूच्या बाटल्या आढळल्याने मंत्र्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. "एसटी प्रवाशांच्या जिवाशी खेळ खपवून घेतला जाणार नाही, दारू पिऊन कामावर आलात तर कोणाचीही गय न करता थेट निलंबन करण्यात येईल," असा जळजळीत इशारा सरनाईक यांनी यावेळी दिला.एसटी डेपोतील पाहणी दरम्यान काही कर्मचारी नशेत असल्याचा संशय आल्याने सरनाईक यांनी प्रशासनाला कडक



सूचना दिल्या. डेपोमध्ये तातडीने ब्रिथ ॲनालायझर मशीनचा वापर सुरू करावा आणि नशेत आढळणाऱ्या कर्मचाऱ्याला कोणत्याही परिस्थितीत बसचे स्टेअरिंग हातात घेऊ देऊ नये, असे त्यांनी ठणकावून सांगितले. "ड्रायव्हरची प्रकृती ठीक नसेल किंवा तो नशेत असेल तर अपघाताची शक्यता वाढते. प्रवाशांची सुरक्षा हीच आमची प्राथमिकता आहे," असे म्हणत त्यांनी या संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआयटी (SIT) स्थापन करण्याचे आदेशही दिले आहेत.

डेपोमधील अस्वच्छतेवर बोलताना त्यांनी अधिकाऱ्यांना फैलावर घेतले. "मंत्री येणार म्हणून केली जाणारी तात्पुरती स्वच्छता मला नकोय. प्रत्यक्ष परिस्थिती अत्यंत बिकट आहे," अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला. डेपो परिसरात तात्काळ सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, स्वच्छतागृहांची दुरुस्ती करणे आणि प्रवाशांच्या सोयींसाठी बस फेऱ्या वाढवण्याचे निर्देश त्यांनी दिले असून, यावर प्रशासनाकडून लेखी उत्तरही मागवले आहे.पाहणीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना प्रताप सरनाईक यांनी राजकीय मुद्द्यांवरही भाष्य केले. खासदार संजय राऊत यांच्यावर टीका करताना ते म्हणाले, "राऊतांना रोज नवी स्वप्ने पडतात, त्यांच्या बोलण्याकडे फारसे लक्ष देण्याची गरज नाही." तसेच, मुख्यमंत्र्यांच्या अनुपस्थितीत उपमुख्यमंत्र्यांनी सरन्यायाधीशांचे स्वागत करणे हा प्रोटोकॉलचा भाग असून त्यात गैर काहीच नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

---

# हिरवा साप आपला इतिहास विसरलाय:महाराष्ट्राला ‘हिरवे’ करण्याचे स्वप्न पाहणाऱ्याला इथेच गाडले गेले, नीतेश राणेंचा जलील यांना इशारा

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

ठाणे महापालिका निवडणुकीतील विजयानंतर AIMIM च्या नवनिर्वाचित नगरसेविका सहर शेख यांनी केलेल्या 'मुंब्रा हरा कर देंगे' विधानाला पक्षाचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी पाठिंबा दिला. "येणाऱ्या काळात संपूर्ण महाराष्ट्र हिरवा करू," असे विधान जलील यांनी केल्याने राज्याच्या राजकारणात ठिणगी पडली आहे. जलील यांच्या या चॅलेंजला भाजप आमदार आणि राज्याचे मंत्री नीतेश राणे यांनी अत्यंत तिखट आणि जहरी शब्दांत प्रत्युत्तर दिले आहे. 'महाराष्ट्र हिरवा करू' म्हणणाऱ्या हिरव्या सापाला जमिनीत गाडू, असा इशारा नीतेश राणे यांनी इम्तियाज जलील यांना दिला.

मुंब्र्यातील एमआयएम नगरसेविका सहर शेख यांनी निवडणुकीनंतर एक वादग्रस्त विधान केले होते. या विधानाचा बचाव करताना माजी खासदार इम्तियाज जलील यांनी, "सहर शेख यांचे विधान हे केवळ त्यांचे वैयक्तिक मत नसून पक्षाचे अधिकृत मत आहे," असे सांगत संपूर्ण महाराष्ट्र हिरवा करण्याचा संकल्प बोलून दाखवला होता. जलील यांच्या याच 'हिरव्या' विधानाचा नीतेश राणे यांनी समाचार घेतला आहे.

मीडियाशी संवाद साधताना नीतेश राणे यांनी इम्तियाज जलील यांचा उल्लेख 'हिरवा साप' असा करत जोरदार प्रहार केला. "हा हिरवा साप कदाचित आपला इतिहास विसरला असावा. औरंगजेब आणि टिपू सुलताननेही महाराष्ट्राला 'हिरवे' करण्याचे स्वप्न पाहिले होते. पण त्यांना याच भूमीत गाडून छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांनी भगवा फडकवत इतिहास घडवला आहे," अशा शब्दांत राणेंनी जलील यांची कानउघाडणी केली.

नीतेश राणे यांनी यावेळी हिंदू राष्ट्राचा पुनरुच्चार करत आक्रमक पवित्रा घेतला. ते म्हणाले, "हे हिंदू राष्ट्र आहे आणि हे कायम भगवेच राहणार, हे जितक्या लवकर हे लोक समजून घेतील तितकं त्यांच्यासाठी चांगलं आहे. जो कोणी या हिंदू राष्ट्राला हरवण्याचे स्वप्न पाहील, त्याला महाराष्ट्रातील हिंदू औरंगजेबाच्या कबरमध्ये पुरल्याशिवाय राहणार नाहीत." राणेंच्या या विधानामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले असून एमआयएम आता यावर काय भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



दरम्यान, इम्तियाज जलील यांच्या ‘महाराष्ट्र हिरवा करण्याच्या’ वक्तव्यावर सुषमा अंधारे यांनीही प्रतिक्रिया देत, उपरोधिक सवाल उपस्थित केला. इम्तियाज जलील यांच्याबद्दल आपल्याला आदर असल्याचे सांगून त्यांनी स्क्रिप्टेड गेममध्ये आपल्याला रस नसल्याचे स्पष्ट केले. भाजपच्या झेंड्यात भगवा आणि हिरवा रंग आहे.

---

## महत्त्वाचे...



### होय, मी भाजपला मदत केली!:एकनाथ खडसे

जळगाव - जिल्ह्याचे राजकारण नेहमीच चर्चेत असते, मात्र यावेळी निमित्त ठरले आहे ते मंत्री गुलाबराव पाटील आणि ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांच्यातील वाकयुद्ध. गुलाबराव पाटील यांनी नाथाभाऊंवर केलेल्या टीकेला उत्तर देताना खडसेंनी अनेक गौप्यस्फोट केले आहेत. मुक्ताईनगर नगरपंचायतीमध्ये राष्ट्रवादीचे नेते असूनही त्यांनी भाजपला मदत केल्याचा आरोप पाटलांनी केला होता. त्यावर नाथाभाऊंनी 'खरं बोलायला काय हरकत आहे? होय, मी भाजपला मदत केली' असे म्हणत स्थानिक गणिते वेगळी असल्याचे स्पष्ट केले. गुलाबराव पाटील यांनी एका सभेत दावा केला होता की, "नाथाभाऊंनी मला खूप त्रास दिला, त्याचीच फळं ते आता भोगत आहेत." यावर पलटवार करताना खडसे म्हणाले, "मी जिल्ह्यात अनेकांना त्रास दिला हे खरं आहे, पण तो त्रास केवळ भ्रष्ट प्रवृत्तीच्या लोकांना आणि गुंडांना दिला आहे. अशा लोकांना जेलमध्ये टाकण्याचे काम मी केले आहे आणि पुढेही करत राहीन. गुलाबराव पाटील विसरले असावेत की त्यांच्या आमदारकीच्या काळात मी त्यांना मोठी मदत केली होती. ते अजून राजकीयदृष्ट्या खूप लहान आहेत."

### आमचे नगरसेवक हरवले आहेत - ठाकरे

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत सत्तेच्या चाव्या कुणाकडे जाणार याची चर्चा सुरू असतानाच, नगरसेवकांच्या पळवापळवीच्या संशयाने राजकीय वातावरण तापले आहे. ठाकरे गटाचे ११ उमेदवार निवडणुकीत विजयी झाले आहेत, मात्र त्यापैकी चार नगरसेवक १६ जानेवारीपासून बेपत्ता असल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणावरून आता ठाकरे गट आक्रमक झाला असून कल्याण पूर्व परिसरात या नगरसेवकांचे "हरवले आहेत" अशा आशयाचे पोस्टर झळकवण्यात आले आहेत.महापालिकेत आपला महापौर बसवण्यासाठी सर्वच पक्षांनी कंबर कसली असताना ठाकरे गटाचे चार शिलेदार अचानक गायब झाले आहेत. बेपत्ता झालेल्या नगरसेवकांमध्ये मधुर म्हात्रे, कीर्ती ढोणे, राहुल कोट आणि स्वप्नील केणे यांचा समावेश आहे. या विजयी उमेदवारांशी कोणताही संपर्क होत नसल्याने अखेर ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी कोळशेवाडी पोलिस ठाण्यात धाव घेऊन लेखी तक्रार दाखल केली आहे. मात्र, "तक्रार देऊनही पोलिस प्रशासन सुस्त असून, नगरसेवकांचा शोध घेण्यास टाळाटाळ केली जात आहे," असा गंभीर आरोप पक्षाच्या स्थानिक नेत्यांनी केला आहे.

नगरसेवकांचा शोध घेण्यात पोलिस हलगर्जीपणा करत असल्याचा गंभीर आरोप ठाकरे गटाच्या नेत्यांनी केला आहे. खासदार संजय राऊत यांनी यावर कडक भूमिका घेत म्हटले आहे की, "आमच्या नगरसेवकांना दबावाखाली किंवा प्रलोभनाखाली पळवून नेले जात असेल तर ते खपवून घेतले जाणार नाही. पोलिसांनी तातडीने त्यांचा शोध घ्यावा, अन्यथा आम्हाला शिवसेना स्टाईलने कारवाई करावी लागेल."

## फॅशन...




अभिनेत्री तेजश्री प्रधान मराठी टीव्ही आणि सिनेमा विश्वातील एक लोकप्रिय कलाकार आहे. तेजश्री सोशल मीडियावर विशेष सक्रिय असून तिची प्रत्येक पोस्ट चाहत्यांसाठी लक्षवेधी ठरते.



सध्या तेजश्री झी मराठीवरील 'वीण दोघांतली ही तुटेना' मालिकेत स्वानंदी ही भूमिका साकारते आहे. मालिकेतील समर आणि स्वानंदी ही जोडी प्रेक्षकांना विशेष आवडते आहे.



या मालिकेच्या निमित्ताने किंवा इतर काही फोटोशूट ती इन्स्टाग्रामवर शेअर करते. असेच काही वेगळ्या लूकमधील फोटो तिने सोशल मीडियावर शेअर केले आहेत.



अभिनेत्रीने या लूकमध्ये लव्हेंडर शिमर सारी, पूर्ण हाताचा ब्लाऊज आणि हिऱ्यांचे दागिने असा लूक केला आहे. तिचे हे फोटोशूट काही महिन्यांपूर्वीचे असून यामधील विविध फोटो तिने आतापर्यंत शेअर केले आहेत.

## केसांचं पातळ शेपूट झालंय? कोरड्या रखरखीत केसांना कुंडीतली कोरफड 'अशी' लावा, केस गळणं होईल लगेच कमी, येईल शाईन



आजच्या धावपळीच्या जीवनात केसांचे आरोग्य टिकवून ठेवणे मोठे आव्हान ठरत आहे. जंक फूडचे सेवन, अपुरी झोप आणि वाढते प्रदूषण यामुळे केसांच्या मुळांना पुरेसे पोषण मिळत नाही. परिणामी, केस मधूनच तुटणे, टोकांना फाटे फुटणे आणि टक्कल पडण्याइतपत केस गळणे या समस्या उद्भवतात. आपण अनेकदा पार्लरमध्ये जाऊन महागड्या हेअर ट्रिटमेंट्स घेतो किंवा हिट स्प्रे वापरतो, परंतु यामुळे केसांमधील नैसर्गिक ओलावा नष्ट होऊन ते अधिकच रखरखीत होतात. या सर्व समस्यांवर 'कोरफड' हा एक अत्यंत स्वस्त आणि प्रभावी घरगुती उपाय आहे.कोरफड केवळ त्वचेसाठीच नाही, तर केसांसाठीही वरदान मानली जाते. कोरफडीचा गर जेव्हा उकडलेला भात, दूध आणि नारळाच्या तेलासोबत एकत्र केला जातो, तेव्हा एक शक्तिशाली 'नॅचरल हेअर मास्क' तयार होतो. हा मास्क केसांच्या मुळांना खोलवर हायड्रेट करतो आणि रसायनांमुळे झालेले नुकसान भरून काढण्यास मदत करतो. नैसर्गिक घटकांचा हा मेळ केसांचा पोत सुधारतो आणि त्यांना रेशमी मऊ बनवतो. जर तुम्हाला केसांची हरवलेली चमक पुन्हा मिळवायची असेल आणि गळती थांबवायची असेल, तर महागड्या उत्पादनांकडे वळण्यापूर्वी हा नैसर्गिक हेअर मास्क वापरणे अत्यंत फायदेशीर ठरेल.कोरफड हा नैसर्गिक ओलाव्याचा एक उत्तम स्त्रोत आहे. कोरफडीच्या गरामध्ये असे अनेक एन्झाईम्स असतात जे टाळूवरील मृत पेशी काढून टाकण्यास आणि केसांच्या मुळांना खोलवर हायड्रेट करण्यास मदत करतात. यामुळे टाळूला थंडावा मिळतो आणि खाज किंवा कोरडेपणाची समस्या दूर होते. नियमितपणे कोरफडीचा वापर केल्यास केसांमधील नैसर्गिक ओलावा टिकून राहतो, ज्यामुळे केस मऊ आणि चमकदार दिसू लागतात. कोरफडीतील घटक केसांच्या मुळांना बळकट करून केस गळती रोखण्यासाठी अत्यंत प्रभावी ठरतात.

शिजवलेल्या भातामधील अमिनो ॲसिड्सचे महत्त्व

तांदळामध्ये किंवा उकडलेल्या भातामध्ये 'इनॉसिटॉल' आणि अमिनो ॲसिड्स भरपूर प्रमाणात असतात, जे केसांच्या मजबुतीसाठी आवश्यक असतात. भाताची पेस्ट जेव्हा केसांना लावली जाते, तेव्हा ती खराब झालेल्या केसांच्या तंतूंना दुरुस्त करण्याचे काम करते.

# प्रजासत्ताक दिनी भारतीय सिनेमातून व्यक्त करणार देशासाठी प्रेम, आता पर्यंत किती झाली बॉर्डर 2 ची कमाई ?



1997 मध्ये आलेल्या "बॉर्डर" चित्रपटाचा पुढचा भाग " बॉर्डर 2 " बाबत गेले काही दिवस प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली होती. आता हा सिनेमा रिलीज झाल्यापासून प्रेक्षकांची मनं जिंकत आहे. सनी देओलसोबत या सिनेमात वरुण धवन, अहान शेट्टी आणि दिलजीत दोसांझ मुख्य भूमिकेत आहेत. चित्रपटाला जोरदार एडव्हान्स बुकिंग मिळाले, शुक्रवारी या सिनेमाला पहिल्या दिवशी 30 कोटींची चांगली ओपनिंग मिळाली. या सिनेमाची किती कमाई झाली ते जाणून घेऊ.

उत्तर भारतात मुसळधार पाऊस आणि अनेक ठिकाणी रिलीजला झालेल्या विलंबामुळे चित्रपटाच्या कमाईत काही लाखांची घट झाली. गेल्या वर्षी प्रदर्शित झालेल्या सर्वाधिक ओपनिंग करणाऱ्या पंधरा चित्रपटांवर नजर टाकता, "बॉर्डर 2" ने चांगली सुरुवात केली आहे. अनुराग सिंह दिग्दर्शित "बॉर्डर 2" हा चित्रपट 275 कोटींच्या बजेटमध्ये बनवण्यात आला होता. त्यामुळे हा सिनेमा "धुरंधर" चा रेकॉर्ड मोडू शकेल का हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल. "बॉर्डर 2" च्या रिलीजमुळे "धुरंधर" च्या कमाईचा वेग आधीच मंदावला आहे.

"बॉर्डर 2" ची खरी परीक्षा आता रविवार आणि प्रजासत्ताकदिनाच्या सुट्टीपासून सुरू होईल. सॅकनिल्कच्या मते, शुक्रवारी 30 कोटी रुपयांच्या दमदार ओपनिंगनंतर, शनिवारी चित्रपटाची कमाई आणखी वाढण्याची अपेक्षा आहे. दुसऱ्या दिवसाच्या सुरुवातीच्या अंदाजानुसार, चित्रपटाने 35 कोटी रुपयांची कमाई केली आहे. त्यामुळे सिनेमाचे एकूण कलेक्शन आता 65 कोटींच्या आसपास पोहचले आहे.

दुसऱ्या दिवशी सकाळच्या शो 15.51%, दुपारच्या शो 39.97%, संध्याकाळच्या शो 49.13% आणि रात्रीच्या शो 61.70% गर्दी होती. सॅकनिल्कच्या मते, 'बॉर्डर 2' ने परदेशातही चांगली सुरुवात केली, पहिल्या दिवशी परदेशात 7.50 कोटींची कमाई केली. या परदेशातील कमाईमुळे चित्रपटाच्या जगभरातील कलेक्शनमध्ये वाढ झाली, जी रिलीजच्या पहिल्या दिवशी 43.50 कोटींवर पोहोचली.

'बॉर्डर 2' ने 2025-26 च्या टॉप टेन ओपनिंग चित्रपटांमध्ये दुसरे स्थान मिळवले आहे. 'छावा' पहिल्या क्रमांकावर आहे. 'धुरंधर'नेही पहिल्या दिवशी 'बॉर्डर' पेक्षा कमी कमाई केली आणि 28 कोटी कमावले, परंतु त्यानंतरच्या दिवसांत हा चित्रपट प्रचंड हिट ठरला.

## ऐश्वर्याच्या पापांचा घडा भरला! सावलीने केला पर्दाफाश, अमृता गरोदर न राहण्यामागचं सत्य अखेर समोर



झी मराठीवरील सावळ्याची जणू सावली ही मालिका आता रंजक वळणावर येऊन ठेपली आहे. महेश कोठारे यांची निर्मिती असलेली ही मालिका अल्पावधीतच प्रेक्षकांच्या पसंती उतरली. मालिकेत सतत येणारी रंजक वळण, मालिकेतील स्टार कास्ट यामुळे मालिका टीआरपीच्या स्पर्धेतही उत्तम कामगिरी करत आहे.गेल्या काही दिवसात या मालिकेवर नजर टाकली असता बऱ्याच खळबळ जनक गोष्टींचा खुलासा झाल्याचे पाहायला मिळाले. विशेष म्हणजे सावलीच्या आवाजाचं सत्य जगासमोर आलं. भैरवी वझे ही सावलीच्या आवाजाचा वापर आपल्या मुलीच्या प्रसिद्धीसाठी करत होती ही बाब सारंगने जगासमोर आणली. अशातच आता आणखी एका मोठ्या गोष्टीचा खुलासा होणार असल्याचा प्रोमो समोर आलाय.

महेंदळे कुटुंबात पाळणा हलत नव्हता. पण सावलीच्या काहीतरी गडबड असल्याचे लक्षात आले. त्यानंतर तिने ऐश्वर्याच्या हालचालींवर नजर ठेवली आणि मग तिचा डाव हाणून पाडला. त्यानंतर सावलीची मोठी जाऊबाई अमृता गरोदर राहिली. ऐश्वर्याला मेहंदळे कुटुंबाच्या घरावर तिची सत्ता हवी होती. पण ती आई बनू शकत नसल्यामुळे तिला दुसऱ्या कोणाचं वर्चस्व घरावर नको होत म्हणून ती हा डाव खेळत होती. आता समोर आलेल्या प्रोमो मध्ये भैरवी वझेचा नवीन लूक समोर येतो. शिवाय ती सावलीच्या बाजूने उभी राहिल्याचे पाहायला मिळते.

ऐश्वर्याच्या किडनॅपिंगचं सत्य ती सर्व कुटुंबासमोर उघड करते. तसेच ऐश्वर्यानेच कार्यक्रमादिवशी सावलीला किडनॅप केल्याचं सांगते. तिच्याकडे एक व्हिडिओ असतो ज्यामध्ये स्वतः ऐश्वर्या त्याची कबुली देत असते. विशेष म्हणजे यावेळी सावली सुद्धा ऐश्वर्याचं इतके दिवस लपवलेलं सत्य सासुबाई समोर उघड करते. सावलीच्या हातात एक बरणी असते. ती ऐश्वर्याला विचारते हे काय आहे ते माहित आहे ना तुम्हाला? ती बरणी पाहताच ऐश्वर्या थोडी घाबरते. सावली खुलासा करत म्हणते की इतके दिवस अमृता वहिनींना बाळ का होत नव्हतं? कारण ऐश्वर्या वहिनी इतके दिवस अमृता वहिनींना बाळ होण्याचं औषध म्हणून बाळ होऊन देण्याचा विष देत होत्या. ऐकताच घरातल्या सगळ्यांच्या पायाखालची सरकते. तिलोत्तमा ऐश्वर्यावर प्रचंड चिडते आणि म्हणते की, तू सून नाहीस या घराची... तुझ्या घराला लागलेली वाळवी आहेस. आता मी तुला माझ्या घरात राहू देणार नाही.हा प्रोमो पाहिल्यानंतर प्रेक्षक भरपूर खुश झाले आहेत. कमेंट सेक्शन मध्ये बहुप्रतिक्षित ट्रॅक , ऐश्वर्याचा पर्दाफाश होणार म्हणून अलेक्झांड ही मालिका पाहण्यासाठी उत्सुक आहे. तर काहींनी भैरवी वझेच्या नवीन लूकचेही कौतुक केले आहे. हे एपिसोड 28 आणि 29 जानेवारी रोजी पाहायला मिळणार आहेत.



## शांत दिसणाऱ्या रोशनचा चढला पारा तन्वीला घराबाहेर काढण्याची इच्छा व्यक्त, कारणीभूत ठरला 'तो' स्पर्धक

बिग बॉस मराठी सीजन 6 चा शो सुरू होऊन आता 2 आठवडे उलटले. सध्या दुसऱ्या आठवड्याचा भाऊचा धक्का सुरू आहे. कालचा एपिसोड मध्ये पाहिले असता रितेश देशमुख याने अनुश्री माने आणि रुचिता जामदार हिची जोरदार शाळा घेतली. गेला आठवडाभर या दोघींनी बिग बॉसच्या घरात जो हैदोस घातला होता त्यावरून त्यांना भरपूर सुनावण्यात आले. तसेच ज्यांनी उत्तम कामगिरी केली त्यांचे कौतुकही झाले.

आता बिग बॉस मराठी सीजन 6 च्या भाऊच्या धक्क्याचा नवीन प्रोमो समोराला आहे. शनिवारच्या एपिसोड मध्ये रितेश देशमुख सर्व स्पर्धकांची कान उघडणी करतो तर रविवारच्या दिवशी काही टास्क होऊन मग एलिमिनेशनचा गेम रंगतो. पहिल्या आठवड्यात कोणीही एलिमिनेट झाले नव्हते. त्यामुळे आता दुसऱ्या आठवड्यात कोणता सदस्य घराबाहेर जाणार हे पाहणे उत्सुकतेच ठरणार आहे.

बिग बॉस मराठीच्या या नवीन प्रोमो मध्ये कोणते कलाकार टाकाऊ आहेत हे स्पर्धकांना सांगायचे असते. त्यासाठी कलाकारांचे फोटो असलेल्या गोण्या दिलेल्या असतात. प्रत्येक कलाकार त्यांना कोणता कलाकार घरात नको आहे हे सांगून त्यामागील कारण देखील सांगतो. घरात सगळ्यात शांत आणि विचारपूर्वक वावरणारा रोशन दादा मात्र यावेळी थोडा संतापलेला दिसला. त्याने तन्वी कोलतेची गोणी फेकून दिली.

त्या मागचे कारण सांगताना तो म्हणाला की, तन्वी मला भाऊ म्हणते आणि ऐनवेळी तिने मला पाठिंबा दिला नाही. यावर तन्वी म्हणाली की तुझी कॅप्टनसी विशाल चालवणार आहे म्हणून मी तुला पाठिंबा दिला नाही. या मुद्द्यावरून दोघांची तू तू मैं मैं होते. रोशन तिच्यावर भडकतो आणि म्हणतो की हा तुझा गैरसमज आहे. बिग बॉस ने मला उगीच इथे आणलेलं नाही. तुम्हाला दुबळा समजते आहेस.

हा प्रोमो पाहिल्यावर अनेक प्रेक्षक कमेंट मधून त्यांच्या भावना किंवा मत व्यक्त करत आहेत. रोशन दादा चुकीच्या ग्रुप मध्ये खेळत असल्याचं मत अनेकांनी व्यक्त केले आहे. बऱ्याच जणांनी रोशनला पाठिंबाही दिला आहे. काहीजण म्हणत आहेत की तनवीने काहीही चुकीचं केलेलं नाही. टोळी मधले सर्वजण विशालच्या म्हणण्याप्रमाणेच करतात.

प्रोमो मध्ये पाहिलेला तन्वी आणि रोशनचा हा वाद आता कुठे टोकाला जातो, पुढल्या दिवशी दोघे एकत्र होतात का की हे भांडण पुढे पर्यंत टिकते हे पाहणे आता उत्सुकतेच ठरेल.

बिग बॉस मराठी सीजन 6 च्या पहिल्या एलिमिनेशन बाबत एक माहिती समोर आली आहे. या घरातून राधा पाटील बाहेर पडली असल्याचे म्हटलं जात आहे. राधाचे काही शो पुढे लाईनअप होते त्यामुळे तिला लवकर घराबाहेर पडावे लागले असे या मागचे कारण दिले जाते. अद्याप या गोष्टीची पुष्टी झाली नसली तरी आज भाऊच्या धक्क्यावर खरे काय ते समजेल.

# अखेर अंशुमनच्या सणसणीत कानाखाली पडलीच!

## राजवाडेंच्या घरात सत्तापालटाला सुरुवात; स्वानंदीने समोर आणलं सत्य

Veen Doghantali Hi Tutena या मालिकेत गेल्या काही दिवसांपासून असे दाखवले होते की, स्वानंदी सर्व राजवाडे कुटुंबासमोर अंशुमनचा खरा चेहरा आणायचा प्रयत्न करते आहे. मात्र, तिच्या प्रयत्नांना यश मिळत नव्हते. मल्लिका आणि अंशुमन मिळून कट रचत असल्याने नवरा समरसमोर स्वानंदीच खोटी ठरत होती. आता आगामी भागात मात्र हे चित्र पालटल्याचे पाहायला मिळेल. ' वीण दोघांतली ही तुटेना 'चा एक नवा प्रोमो प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे, ज्यात स्वानंदीमुळे अंशुमनची घाणेरडी बाजू सर्वांसमोर येते.

'वीण दोघांतली ही तुटेना'मधील राजवाडेंच्या घरात सत्तापालट होणार, असे आव्हान आधीच स्वानंदीने समरची काकू मल्लिका हिला दिले होते. मल्लिकाचा मुलगा अंशुमनचा खरा चेहरा सर्वांसमोर आणून स्वानंदीने या सत्तापालटास सुरुवात केली. अंशुमन ऑफिसमधील एका मुलीला त्रास देतो आणि असा प्रकार त्याने अनेक मुलींसोबत केला आहे, हे सिद्ध करण्याच्या मागावर स्वानंदी होती. मात्र, याआधी अनेकदा त्यांनी तिला खोटे ठरवले होते. आता स्वानंदी पुरावा म्हणून आणलेला व्हिडिओ सर्वांना दाखवते आणि अंशुमनचा खोटेपणा सर्वांसमोर उघड होतो. 27 आणि 28 जानेवारी रोजी हे एपिसोड प्रसारित होणार आहेत.

अंशुमन श्वेताला त्रास देत असल्याचा व्हिडिओ स्वानंदी समर राजवाडेसह घरातील सर्वांना दाखवते. ती म्हणते की, 'ज्याला तुम्ही आदर्श भाऊ मानता, त्याचा खरा चेहरा सगळ्यांसमोर येणं खूप गरजेचं होतं.' त्यावर समर अंशुमनला म्हणतो, 'किती विश्वास ठेवला तुझ्यावर, किती विकृत वागलास तू...' सर्वांसमोर सत्य येऊनही अंशुमन म्हणतो, 'दादा तुला माहीत नाहीये, श्वेताच एक नंबरची यूजलेस आणि चेप मुलगी आहे.' भावाचे असे विचार ऐकताच समर त्याच्या सणसणीत कानाखाली मारतो. समर विचारतो की, 'एवढं खोट बोलण्याची आणि नालायकपणाची हिंमत येते कुठून?'

एवढंच नव्हे तर आजी अंशुमनला सांगते की, त्याने श्वेताची हात जोडून



माफी मागावी. घरातील सर्वांसमोर पितळ उघडं पडल्याने अंशुमन गुडघ्यावर टेकून श्वेताची माफी मागितली. त्याने जरी माफी मागितली असली तरी स्वानंदी आणि श्वेतावर तो भडकला असल्याचे या प्रोमोमध्ये स्पष्ट दिसले. यानंतर मल्लिका-अंशुमनची काय खेळी असेल आणि स्वानंदी त्यांना प्रत्युत्तर कशी देईल, हे आगामी भागातच स्पष्ट होईल.

## अर्थविश्व...

### मौजेसाठी कर्ज काढतेय नवी पिढी, YOLO चा मंत्र अन् स्टेटसच्या अट्टाहासानं लोन ट्रॅपमध्ये अडकतायत तरुण




आजची तरुण पिढी 'डिजिटल नेटिव' ऐवजी 'डेब्ट नेटिव' म्हणजेच कर्जात बुडालेली पिढी बनत चालली आहे. ही पिढी आपल्याकडे असणाऱ्या पैशांनुसार नाही, तर सोशल मीडियावरील 'फीड'नुसार जगत आहे. बचत आणि भविष्याऐवजी जीवनशैली टिकवून ठेवण्याचा दबाव त्यांच्यावर आहे. 'यू ओनली लिव वन्स' (YOLO) या मंत्राखाली ते बिल एकदाच येते हे विसरत आहेत.

18 ते 30 वयोगटातील तरुण

GWI च्या रिपोर्टनुसार, जेन-झी जुन्या पिढ्यांपेक्षा सोशल मीडियामुळे 30% अधिक प्रभावित होऊन खरेदी करते. त्यांच्यासाठी खरेदी आता गरज नसून एक 'डोपामाइन हिट' आहे. ही 'हिट' क्रेडिट कार्ड किंवा 'बाय नाऊ पे लेटर' (BNPL) द्वारे घेतली जाते तेव्हा समस्या सुरू होते. CRIF High Mark च्या रिपोर्टनुसार, भारतात 'स्मॉल तिकीट पर्सनल लोन' (50000 रुपयांपेक्षा कमी) घेणाऱ्यांमध्ये 18 ते 30 वयोगटातील तरुणांचा मोठा वाटा आहे. हे कर्ज व्यवसाय किंवा घरासाठी नसून लेटेस्ट स्नीकर्स, आयफोन किंवा म्युझिक फेस्टिव्हलच्या तिकिटांसाठी घेतले जात आहे. नो-कॉस्ट ईएमआय देखील नवीन पिढीसाठी एक जाळे बनत आहे.

मध्यमवर्ग नेहमी बचतीतून अनेक साधन सुविधेचा लाभ घायचा. शेवटचा पर्याय म्हणून कर्जास पाहिले जायचे. पण आज ते 'स्टेटस सिंबल' बनले आहे. TransUnion CIBIL च्या डेटानुसार, पहिल्यांदा कर्ज घेणाऱ्या ग्राहकांमध्ये तरुणांची संख्या सर्वाधिक आहे. धक्कादायक बाब म्हणजे, यातील मोठी लोकसंख्या 'डेब्ट ट्रॅप'मध्ये अडकत आहे, जिथे एका क्रेडिट कार्डचे बिल भरण्यासाठी दुसऱ्या ॲपवरून कर्ज घेतले जात आहे.

Prerak (Medium) च्या विश्लेषणानुसार, जेन-झी 'लाइफस्टाइल'साठी कर्ज घेऊन त्याला सर्वायव्हल ची गरज सांगत आहे. त्यांच्यासाठी महागडा स्मार्टफोन किंवा कॅफेची कॉफी आता लक्झरी नसून समाजात टिकून राहण्याची अनिवार्यता बनली आहे. ही 'एस्पिरेशनल क्लास' आपल्या खऱ्या अस्तित्वापासून दूर एका काल्पनिक जगाला टिकवून ठेवण्याच्या प्रयत्नात आपल्या भविष्यातील बचतीची किंमत मोजत आहे. ICE 360 Survey चे काही संकेत सांगतात की भारतीय कुटुंबांची बचत गेल्या काही दशकांतील सर्वात कमी पातळीवर पोहोचली आहे. जेव्हा तरुण पिढी आपल्या उत्पन्नाचा 40-50% हिस्सा केवळ व्याज आणि कर्जाच्या हप्त्यांमध्ये देईल, तेव्हा ती देशाच्या अर्थव्यवस्थेत उत्पादक गुंतवणूक कशी करेल? फिनटेक कंपन्यांनी '2 मिनिटांत लोन'चे जे जाळे विणले आहे, त्यात हे तरुण सर्वात आधी अडकत आहेत.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या डिसेंबर 2025 च्या फायनान्शियल स्टेबिलिटी रिपोर्ट (FSR) नुसार, 'अनसिक्योर्ड लोन्स'ची वाढ धोकादायक पातळीवर आहे. तरुण कर्ज तर घेत आहे पण फेडण्याबाबत संदिग्धता दिसून येते. RBI चा रिपोर्ट यावर शिक्कामोर्तब करते की बँकांना आता या छोट्या कर्जांवर लगाम लावावा लागेल, अन्यथा भविष्यात मोठे आर्थिक संकट उभे राहू शकते.

### सोनं-चांदीच्या किमतीमुळे मार्केटमध्ये तुफान येणार, ट्रम्प यांच्या एका निर्णयामुळे खळबळ उडणार



मागीलआठवड्यात सोने आणि चांदीच्या किमतीत लक्षणीय वाढ झाली. अमेरिकेचे अध्यक्ष Donald Trump यांच्या टॅरिफ धमक्या आणि धोरणांमुळे या वाढत्या किमतींना कारणीभूत ठरले आहे. दुसऱ्यांदा अध्यक्ष झाल्यापासून त्यांनी अनेक देशांवर शुल्क लादले आहे आणि वारंवार तसे करण्याची धमकी दिली आहे. अगदी अलिकडेच त्यांनी कॅनडावर 100% Tariff लादण्याची धमकी दिली आहे. ट्रम्प यांच्या या धमकीमुळे येत्या आठवड्यात सोने आणि चांदीच्या किमतीत आणखी एक मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. सोने आणि चांदीच्या किमतीत वाढ गुंतवणूकदारांना फायदा देत असली तरी, त्यामुळे सामान्य जनता आणि लहान व्यापाऱ्यांचा ताणही वाढतो.अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अलीकडेच आठ युरोपीय देशांवर 10% टॅरिफ लादण्याची घोषणा केली. नंतर त्यांनी टॅरिफ मागे घेतले. त्यांनी कॅनडाला चीनसोबत कोणताही व्यापार करार केल्यास 100% टॅरिफ लादण्याची धमकी दिली आहे. ट्रम्प यांनी कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्यावरही टीका केली. त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, ट्रुथ सोशलवरील एका पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे की जर कॅनडाला वाटत असेल की ते चीनसाठी ड्रॉप-ऑफ पोर्ट तयार करू शकतात, जिथून चिनी वस्तू अमेरिकेत पाठवता येतील, तर ते गंभीर चूक करत आहेत. जर कॅनडा चीनसोबत असा कोणताही व्यापार करार करत असेल, तर त्यांच्या सर्व उत्पादनांवर अमेरिकेत 100% कर आकारला जाईल. त्यांनी असेही म्हटले आहे की आपला शेजारी देश कॅनडा अमेरिकेला पाठिंबा देण्याऐवजी त्याच्याशी संबंध मजबूत करण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. जेव्हा जेव्हा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एखाद्या देशावर कर जाहीर केला आहे, तेव्हा बाजारात अनिश्चितता निर्माण झाली आहे. ग्रीनलँड संकटादरम्यानही अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत, गुंतवणूकदार सुरक्षित मालमत्तांकडे वळतात, ज्यामुळे सोने, चांदी आणि तांबे यासारख्या धातूंच्या किमती वाढतात. शुक्रवारी, एमसीएक्स एक्सचेंजवर सोने प्रति दहा ग्रॅम ₹ 155,936 आणि चांदी ₹334,600 प्रति किलोग्रॅमवर पोहोचले. जर ट्रम्प त्यांच्या कर निर्णयावर टिकून राहिले तर येत्या काही दिवसांत सोने आणि चांदीच्या किमतीत आणखी एक मोठी वाढ होऊ शकते.

# भारत आणि पाकिस्तान येणार आमने सामने

मुंबई: भारत आणि पाकिस्तान सामना म्हटलं की चर्चा ही होतेच. भारत आणि पाकिस्तान सामन्याचे क्रेझ आपल्याला नेहमीच पाहायला मिळाले आहे. भारत आणि पाकिस्तान सामना लोक आवर्जून पाहतात. आता IND vs PAK संघामध्ये सामना रंगणार आहे. पण तो सामना कधी रंगणार, कुठे खेळवला जाणार आणि किती वाजता ते जाणून घ्या...

भारतीय क्रिकेट संघाने 2026 च्या 19 वर्षांखालील विश्वचषकाच्या सुपर सिक्समध्ये स्थान निश्चित केले. त्यांनी शेवटच्या गट सामन्यात न्यूझीलंडचा सात विकेट्सने पराभव केला. यामुळे टीम इंडिया ग्रुप बी मध्ये अव्वल स्थानावर आहे. आयुष म्हात्रे यांच्या नेतृत्वाखालील संघ आता सुपर सिक्समध्ये खेळेल, जिथे त्यांचे दोन सामने खेळायचे आहेत.सुपर सिक्समध्ये भारतीय संघ झिम्बाब्वे आणि पाकिस्तानशी सामना करेल. टीम इंडियाचा सामना 27 जानेवारी रोजी झिम्बाब्वेशी होईल, त्यानंतर 1 फेब्रुवारी रोजी पाकिस्तानशी होईल. दोन्ही सामने बुलावायोमध्ये खेळले जातील. झिम्बाब्वे आणि पाकिस्तान दोघेही ग्रुप सी मधून पुढे गेले. पाकिस्तान ग्रुप सी मध्ये दुसऱ्या क्रमांकावर राहिला, तर झिम्बाब्वे तिसऱ्या क्रमांकावर राहिला.

भारत आणि पाकिस्तान शेवटचे 2020 मध्ये 19 वर्षांखालील विश्वचषकात आमने सामने आले होते. दोन्ही संघ उपांत्य फेरीत खेळले होते, ज्यामध्ये भारताने 10 विकेट्सने विजय मिळवला होता. 2018 च्या आवृत्तीत, टीम इंडिया आणि पाकिस्तान उपांत्य फेरीतही आमनेसामने आले होते. भारताने 203 धावांनी विजय मिळवला. यापूर्वी, 2012 मध्ये, दोन्ही शेजारी संघ आमनेसामने आले होते आणि भारताने एका विकेटने विजय मिळवला होता. 2010 हा हंगाम होता जेव्हा पाकिस्तानने अंडर-19 विश्वचषकात भारताचा शेवटचा पराभव केला होता. पाकिस्तानने दोन विकेटने विजय मिळवला होता.



भारतीय संघाने अंडर-19 विश्वचषक सुपर सिक्समध्ये चार गुणांसह प्रवेश केला. त्यांनी त्यांचे सर्व गट सामने जिंकले, ज्याचा त्यांना सुपर सिक्समध्ये फायदा होईल. भारताने प्रथम अमेरिकेचा सामना केला आणि त्यांना सहा विकेटने पराभूत केले. टीम इंडियाने बांगलादेशचा 18 धावांनी पराभव केला. गेल्या आवृत्तीत भारत अंतिम फेरीत पोहोचला. त्यांनी पाच वेळा स्पर्धा जिंकली आहे, ज्यामुळे ते सर्वात यशस्वी संघ बनले आहेत.

## पाकिस्तानचा माज आयसीसीने उतरवला, मोहसिन नक्वींची बोलतीच केली बंद

नवी दिल्ली : बांगलादेशने भारतामधील वर्ल्ड कपवर बहिषअकार टाकत आपल्या पावलावर धोंडा मारून घेतला आहे. त्यानंतर आता पाकिस्तानही भारताला धक्का देण्यासाठी तयार असल्याचे म्हणत आहे. पाकिस्तानच्या मोहसिन नक्वी यांनी आयसीसीला धारेवर धरले होते. पण आता आयसीसीने मोहसिन नक्वी यांची बोलतीच बंद केली असल्याचे समोर आले आहे.

पाकिस्तानच्या मोहसिन नक्वींनी आयसीसीबद्दल काय म्हटले होते...'ही एका देशाची हुकुमशाही आहे. पाकिस्तान आणि भारतासाठी सोयीनुसार ठिकाणे बदलली जातात; मग बांगलादेश क्रिकेट संघासाठी असे का केले गेले नाही? आमचे धोरण स्पष्ट आहे. सरकार जो निर्णय घेईल, तो आम्ही पाळणार आहोत. आम्ही आयसीसीच्या नव्हे, तर आमच्या सरकारच्या अधीन आहोत. पंतप्रधान परतल्यानंतर ते वर्ल्ड कपमधील सहभागाबाबत निर्णय घेतील'. बांगलादेश क्रिकेटमधील मोठा भागधारक असून, आयसीसीने त्यांना दिलेली वागणूक अन्यायकारक आहे. हे मी बुधवारी झालेल्या बैठकीतही सांगितले होते. वेळ आल्यावर सर्व गोष्टी मी सांगेन', असे नक्वी यांनी सांगितले.मोहसिन नक्वींनी आपल्या अधिकाराचा गैरवापर केला आणि भारताला आशिया कपची ट्रॉफी दिली नव्हती. आता त्याच मोहसिन नक्वी यांच्यासह आयसीसी आता पाकिस्तानची कोंडी करायला सज्ज झाली आहे. आयसीसीने मोहसिन नक्वी यांच्यासह पाकिस्तानच्या क्रिकेट मंडळाला सांगितले की, वर्ल्ड कप ऐन तोंडावर आला असताना त्यावर बहिष्काराचा निर्णय घेणे, हे चुकीचे आहे.




## बांगलादेशवर कारवाई झाल्यानंतर पाकिस्तान आला वठणीवर

### T20 World Cup पूर्वी बदलली मोठी भूमिका

मुंबई: 7 फेब्रुवारी 2026 रोजी T20 World Cup सुरू होणार आहे. या विश्वचषकापूर्वी ICC एक मोठा निर्णय घेतला आणि बांगलादेशला विश्वचषकाच्या बाहेर केले आहे. बांगलादेशला बहिष्कार टाकणं खूपच महागात पडले. यानंतर पाकिस्तानही विश्वचषकावर बहिष्कार टाकण्याच्या तयारीत होता पण आयसीसीचे टोकाचे पाऊल पाहता त्यांनी त्यांची भूमिका बदलून आता विश्वचषकापूर्वी मोठा निर्णय घेतला आहे.

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने 25 जानेवारी रोजी या स्पर्धेसाठी 15 सदस्यीय संघाची घोषणा केली. संघ जाहीर करुन बहिष्कार टाकण्याची भूमिका बदलण्याचा निर्णय पाकिस्तानने घेतला असल्याचे दिसत आहे. या महत्त्वाच्या स्पर्धेसाठी निवडकर्त्यांनी बाबर आझम, फहीम अश्रफ आणि मोहम्मद नवाज सारख्या अनुभवी खेळाडूंना संघात समाविष्ट केले आहे, तर मोहम्मद रिझवान आणि हरिस रौफ सारख्या



खेळाडूंना वगळले आहे. पाकिस्तान या विश्वचषकात सलमान अली आघाच्या नेतृत्वाखाली खेळेल.

25 जानेवारी रोजी सकाळी लाहोरमधील गद्दाफी स्टेडियमवर पत्रकार परिषदेद्वारे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने संघाची घोषणा केली. पीसीबीचे उच्च कामगिरी संचालक आणि पुरुषांच्या राष्ट्रीय निवड समितीचे सदस्य, आकिब जावेद, पाकिस्तानचे टी-20 कर्णधार सलमान अली आघा आणि व्हाईट-बॉल मुख्य प्रशिक्षक माइक हेसन पत्रकार परिषदेत उपस्थित होते.

आगामी विश्वचषकासाठी पाकिस्तानच्या संघात या मोठ्या स्पर्धेत प्रथमच सहा खेळाडूंचा समावेश आहे. कर्णधार सलमान अली आघा, फहीम अश्रफ, ख्वाजा मोहम्मद नाफे, मोहम्मद सलमान मिर्झा, साहिबजादा फरहान आणि उस्मान तारिक पहिल्यांदाच टी-20 विश्वचषकात खेळणार आहेत. 2026 च्या टी-20 विश्वचषकापूर्वी, पाकिस्तान ऑस्ट्रेलियाविरुद्ध घरच्या मैदानावर टी-20 मालिका खेळेल.

पाकिस्तान टी-20 विश्वचषकात आपल्या मोहिमेची सुरुवात 7 फेब्रुवारी रोजी नेदरलँड्सविरुद्धच्या सामन्याने करेल. हा सामना कोलंबोमध्ये खेळला जाईल. त्यानंतर 10 फेब्रुवारी रोजी त्यांचा सामना अमेरिकेशी होईल. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील अंतिम सामना 15 फेब्रुवारी रोजी कोलंबोमध्येच होईल. गट टप्प्यातील पाकिस्तानचा शेवटचा सामना 18 फेब्रुवारी रोजी नामिबियाविरुद्ध होईल. या टी-20 विश्वचषकासाठी पाकिस्तानला ग्रुप ए मध्ये स्थान देण्यात आले आहे.

2026 च्या T20 विश्वचषकासाठी पाकिस्तानचा संघ:

सलमान अली आघा (कर्णधार), अबरार अहमद, बाबर आझम, फहीम अश्रफ, फखर जमान, मोहम्मद ख्वाजा (यष्टीरक्षक), मोहम्मद नवाज, मोहम्मद सलमान मिर्झा, नसीम शाह, साहिबजादा फरहान (यष्टीरक्षक), सैम अय्युब, शाहीन शाह आफ्रिदी, शादाब खान, उस्मान खान (विकेटकीपर), उस्मान खान (विकेटकीपर).

## WPL मध्ये RCB चा पहिला पराभव:दिल्ली कॅपिटल्स ७ विकेट्सने जिंकली, नंदिनी शर्माने ३ विकेट्स घेतल्या; वोलवार्टने ४२ धावा केल्या

महिला प्रीमियर लीग (WPL) च्या चौथ्या हंगामात रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु (RCB) ला सलग पाच विजयांनंतर पहिला पराभव पत्करावा लागला. वडोदरा येथे शनिवारी दिल्ली कॅपिटल्सने RCB ला 7 गडी राखून हरवले. वेगवान गोलंदाज नंदनी शर्माने 3 बळी घेतले. तर लॉरा वोलवार्टने 42 धावा केल्या.

मंधाना बाद होताच RCB विखुरली

कोटाम्बी स्टेडियमवर दिल्लीने गोलंदाजी निवडली. ग्रेस हॅरिस आणि कर्णधार स्मृती मंधानाने 36 धावांची सलामीची भागीदारी केली. हॅरिस 9 धावा करून बाद झाली. त्यानंतर मंधाना 38 धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली. या विकेटनंतर संघाचे विखुरणे सुरू झाले.जॉर्जिया वोल 11, गौतमी नायक 3, यष्टिरक्षक ऋचा घोष 5, राधा यादव 18 आणि नदीन डी क्लर्क 5 धावा करून बाद झाल्या. संघ 109 धावांवर गारद झाला. दिल्लीकडून नंदनी शर्माने 3 बळी घेतले. शिननेल हेन्री, मारिझान कॅप आणि मिन्नू मणी यांना प्रत्येकी 2-2 बळी मिळाले. श्री चरणीने 1 बळी घेतला.

स्मृतीने बंगळूरुसाठी सर्वाधिक ३८ धावा केल्या.

दिल्लीची खराब सुरुवात

११० धावांच्या लक्ष्यासमोर दिल्लीने २४ धावांवर २ विकेट गमावले. शेफाली वर्मा १६ आणि लिझेल ली ६ धावा करून बाद झाल्या. लॉरा वोलवार्टने पुन्हा कर्णधार जेमिमा रॉड्रिग्ससोबत अर्धशतकी भागीदारी केली. जेमिमा २४ धावा करून बाद झाली. मारिजन कॅपने शेवटी १९ धावा करून संघाला १६व्या षटकात विजय





मिळवून दिला. वोलवार्ट ४२ धावा करून नाबाद परतली.

बंगळूरुसाठी सायली साटघरेने १८ धावा देऊन २ विकेट घेतल्या. राधा यादवला १ विकेट मिळाली. लॉरेन बेल, अरुंधती रेड्डी, श्रेयांका पाटील, नदीन डी क्लर्क आणि जॉर्जिया वोल यांना एकही विकेट मिळाली नाही.

लॉरा वोलवार्टने 42 धावा करून दिल्लीला विजय मिळवून दिला.

लॉरा वोलवार्टने 42 धावा करून दिल्लीला विजय मिळवून दिला.

दुसऱ्या स्थानावर पोहोचली दिल्ली

चौथ्या हंगामात सलग दुसऱ्या विजयामुळे दिल्ली कॅपिटल्सने गुणतालिकेत दुसरे स्थान पटकावले. संघाचे 6 सामन्यांत 3 विजयांसह 6 गुण आहेत. गुजरात इतकेच गुण घेऊन तिसऱ्या स्थानावर आहे. मुंबई चौथ्या आणि यूपी पाचव्या स्थानावर आहेत, दोघांचेही 4-4 गुण आहेत. बंगळूरु 10 गुणांसह पहिल्या स्थानावर आहे, संघाने प्लेऑफमध्येही स्थान निश्चित केले आहे.



## श्रीकृष्ण नृत्यालयाचे विद्यार्थी प्रजासत्ताकदिनी दिल्लीत कर्तव्य पथावर

नागपूर : भारतीय शास्त्रीय नृत्यासाठीची एक अग्रगण्य संस्था असलेल्या श्रीकृष्ण नृत्यालयाच्या प्रतिभावान विद्यार्थ्यांची २६ जानेवारी रोजी दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय प्रजासत्ताक दिनी सोहळ्यात मोहिनीअट्टम सादर करण्यासाठी निवड झाली आहे. भारताच्या मा. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत 'मोहिनीचे नृत्य' सादर करणार आहेत. विद्यार्थ्यांनी १३ जानेवारी पासून कठोर प्रशिक्षण आणि तालमी केल्या आहेत. 'स्वातंत्र्याचा मंत्र-वंदे मातरम' या संकल्पने अंतर्गत २५०० कलाकारांचा समावेश असलेल्या एका मोठ्या सांस्कृतिक कार्यक्रमाचा भाग आहे. श्रीकृष्ण नृत्यालयाच्या संचालिका श्रीमती प्रमिला उन्नीकृष्णन आणि डॉ.हनी उन्नीकृष्णन यांनी संगीत नाटक अकादमी, दिल्लीद्वारे संस्थेच्या विद्यार्थ्यांची निवड झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन असून जो देशाच्या सांस्कृतिक विविधतेसह आणि लष्करी सामर्थ्यासह 'वंदे मातरम' या राष्ट्रगीताची १५० वर्षे साजरी करत आहे. दिल्लीच्या सोहळ्यात नागपूरच्या विद्यार्थ्यांचे सादरीकरण होत असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे उर्मिला उन्नीकृष्णन यांनी दिली.





















१ २ ३ ४ ५ ६